❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शनिवार, दि. ०५ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २५१ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews



फुलांचा हार पावसाची सर
राधा-कृष्णाच्या प्रेमाला आली बहर
साजरा करूया गोपालकाल्याचा सण!
गोपाळकाला निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा..

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गोविंदा आला रे

# पुण्यातील वाहतूक व्यवस्था वेगवान करण्याचा निर्धार

## बजाज फिनसर्व्हच्या अत्याधुनिक मुख्यालयामुळे पुण्याच्या विकासाला नवी दिशा मिळेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ पुणे (दै. संध्या)




बजाज फिनसर्व्हच्या माध्यमातून पुण्यात उभारण्यात येणारे आधुनिक आणि शाश्वत सुविधांनी युक्त मुख्यालय शहराच्या विकासाला नवी दिशा देणारे ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पुण्याला देशातील आधुनिक आणि वेगवान मोबिलिटी असलेले शहर म्हणून विकसित करण्यासाठी शासनाकडून आवश्यक पायाभूत सुविधा वेगाने उभारण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

बजाज फिनसर्व्हच्या प्रस्तावित मुख्यालयाच्या भूमिपूजन समारंभात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, बजाज फिनसर्व्हचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज, बजाज फिनसर्व्ह सीएसआरच्या अध्यक्षा शेफाली बजाज, बजाज फायनान्सचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजीव जैन, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह बजाज समूहातील पदाधिकारी, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, पुणे आणि मुंबई देशातील फिनटेक इकोसिस्टीमची राजधानी झाली आहेत. पहिल्या तिमाहीत मुंबईने बंगळूरुला मागे टाकले असून एकूण फिनटेक गुंतवणुकीपैकी 61 टक्के गुंतवणूक मुंबईत झाली आहे. फिनटेक स्टार्टअपमध्येही मोठी वाढ झाली असून 59 टक्के वाढ आणि 900 दशलक्ष डॉलर्सची गुंतवणूक या क्षेत्रात झाली आहे. ही इकोसिस्टीम नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथेही नेण्याची गरज आहे. लवकरच नागपूरमध्येही बजाज फिनसर्व्हची सेवा सुरू झालेली दिसेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पुणे वेगाने वाढणारे शहर आहे. या वेगाला अनुरूप आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. बाह्य आणि अंतर्गत रिंगरोडसोबत भुयारी मार्गाचे जाळे निर्माण करण्यात येणार आहे. पुढील तीन ते चार वर्षांत पुण्याची ओळख वेगवान वाहतूक व्यवस्था असलेले शहर म्हणून निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. आधुनिक शहर म्हणून पुण्याची ओळख निर्माण करायची असून त्यामध्ये बजाज फिनसर्व्हचा आधुनिक परिसर महत्त्वाची भूमिका बजावेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, पुण्यात उभारण्यात येणारे बजाज फिनसर्व्ह पुणे परिसर आणि त्यातील सुविधा देशातील महत्त्वाची आणि शाश्वत व्यवस्था ठरणार आहे. या व्यवस्थेत सुमारे 40 हजार कर्मचारी सहभागी होणार आहेत. परिसराला जोडणारा रस्ता आणि अतिरिक्त पूल इमारतींचे काम पूर्ण होण्यापूर्वी उभारण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. बजाज समुहाने पुण्यात कला आणि सांस्कृतिक केंद्र उभारण्याचा मनोदय व्यक्त केला असून महानगरपालिकेसह सर्वांच्या सहकार्याने असे केंद्र उभारण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आर्थिक व्यवहार आणि बँकिंग क्षेत्रात महाराष्ट्र पुढे असून राज्याला आणखी पुढे नेण्यासाठी विशेष धोरण तयार करण्यात आले आहे. डोमेस्टिक इन्शुरन्स आणि डिजिटल लेंडिंग मार्केटमध्ये महाराष्ट्राने आपले वर्चस्व कायम ठेवावे याद्दष्टीने प्रयत्न सुरू आहेत. फिनटेक क्षेत्रात महाराष्ट्राचे नेतृत्व अधिक भक्कम करण्यासाठी बजाज फिनसर्व्हने राज्य शासनासोबत सहकार्य करावे, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

बजाज फिनसर्व्हने फायनान्शियल टेक्नॉलॉजीचा उपयोग करून या क्षेत्रात आधुनिकता आणल्याने फिनटेक क्षेत्रातील महत्वाची संस्था म्हणून या समूहाकडे पाहिले जाते असे नमूद करून बजाज समूहाने स्थापनेपासून भारताचा औद्योगिक विकास आणि राष्ट्रनिर्माणात दिलेल्या योगदानाचा आणि शासनाच्या सामाजिक उपक्रमातील सहभागाचा मुख्यमंत्र्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. बजाज समूहाचा शंभर वर्षांचा वारसा आणि आधुनिक तंत्रज्ञानाची दूरद्दष्टी यांचा सुंदर संगम बजाज फिनसर्व्हच्या नव्या कॅम्पसमध्ये पाहायला मिळणार असून, हा कॅम्पस पुण्याच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेला अधिक बळ देणारा ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला. बजाज फिनसर्व्हचा महाराष्ट्र शासनासोबत 6 हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार झाला असून, त्यातून राज्यातील गुंतवणूक आणि वित्तीय सेवा क्षेत्राला चालना मिळेल. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून वित्तीय सेवांना नवी दिशा देण्याचा बजाज समूहाचा प्रयत्न उल्लेखनीय आहे, असे उपमुख्यमंत्री म्हणाल्या. कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक, इन्शुअरटेक, डेटा ॲनालिटिक्स आणि डिजिटल वित्तीय सेवा यांसारख्या नव्या क्षेत्रांमध्ये पुण्यातील तरुणांसाठी रोजगार व कौशल्यविकासाच्या मोठ्या संधी निर्माण होत आहेत. या आधुनिक कॅम्पसमुळे नव्या कौशल्यांना, कल्पनांना आणि तरुण पिढीला अधिक संधी मिळतील, असे श्रीमती पवार यांनी सांगितले. बजाज समुहाचे आकुर्डी, वाळूज आणि चाकण परिसराच्या औद्योगिक विकासातही समूहाचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचेही त्या म्हणाल्या. बजाज फिनसर्व्हचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, पुण्यातील 7.2 दशलक्ष चौरस फुटांचा नवा परिसर शाश्वतता, पर्यावरणपूरक रचना, कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि तंत्रज्ञानावर आधारित असेल. कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ऊर्जा-पाणी बचत आणि भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या रचनेतून हा परिसर विकसित केला जाणार आहे.

संध्या प्रहार




## थोडक्यात...

### स्वतंत्र भारद्वाज पोलिसांच्या ताब्यात

नवी दिल्ली : दैनिक संध्या

सीजेपी आंदोलक निशू आझाद हिचे वडील संजय कुमार यांच्यावर 20 जुलै रोजी हल्ला करणाऱ्या आरोपी स्वतंत्र भारद्वाज याला दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. दिल्ली पोलिसांनी उत्तर प्रदेशच्या बुलंदशहर येथून स्वतंत्र भारद्वाज याला 4 सप्टेंबर म्हणजे आज ताब्यात घेतलं. दिल्ली पोलिसांनी भारद्वाजला स्थानिक पोलीस स्टेशनला नेलं आहे, तिथं पोलिसांकडून त्याची चौकशी सुरु आहे.निशू आझाद हिनं काल एक व्हिडिओ पोस्ट करत राहुल गांधी यांच्याकडे न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती. राहुल गांधी यांनी देखील पोस्ट करत उत्तर देत, तिच्यासोबत असल्याचं म्हटलं होतं. स्वतंत्र भारद्वाजनं एका पॉडकास्टमध्ये संजय कुमार यांच्यावरील हल्ल्याचा उल्लेख केला होता. हा व्हिडिओ व्हायरल होताच कॉकरोच जनता पार्टी, काँग्रेस, आझाद समाज पार्टी (कांशीराम) पक्षाचे नेते आक्रमक झाले होते. सीजेपीचे आशुतोष रांका, सौरव दास आणि काँग्रेस विद्यार्थी आघाडीचे विनोद जाखड, खासदार चंद्रशेखर आजाद यांच्यासह इतर कार्यकर्ते नवी दिल्लीतील संसद मार्ग पोलीस स्टेशनला पोहोचले आणि त्यांनी स्वतंत्र भारद्वाज याच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी केली होती. या नेत्यांनी दिल्ली पोलिसांसोबत 2 तास चर्चा केली. यानंतर आरोपीवर ॲट्रोसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला जाईल, असा निर्णय घेण्यात आला. संजय कुमार यांची पुन्हा एकदा वैद्यकीय तपासणी केली जाईल. वैद्यकीय रिपोर्टच्या आधारावर या प्रकरणात हत्येचा प्रयत्न असा गुन्हा दाखल केला जाईल, असं ठरवण्यात आलं.

## मराठ्यांवर किती जळणार? ओबीसींच्या नावावर सगळं खाल्लं

### महाराष्ट्र सदनही सोडलं नाही; जरांगेंची भुजबळांवर टीका

■ जालना (दै. संध्या)



राज्याचे मंत्री छगन भुजबळांनी मराठा उपसमितीच्या निर्णयावरून नाराजी व्यक्त केल्यानंतर आता त्यावर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या वयात त्यांनी स्वतःचं राजकारण पाहावं, पुतण्याला खासदार कसं करता येतं ते पाहावं. ओबीसींच्या नावावर त्यांनी सगळं खाल्लं, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी टीका केली. वेळ पाहून कधी महाविकास आघाडीमध्ये जातात, कधी महायुतीमध्ये जातात, कधी अजितदादांसोबत जातात. यांनी ओबीसी महमंडळ खाल्लं, महाराष्ट्र सदनही सोडलं नाही, अशी जळजळीत टीका जरांगे यांनी भुजबळांवर केली.

राज्यात ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, त्यांना प्रमाणपत्र देण्यात यावं, यासह मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे हे अंतरवाली सराटीमध्ये उपोषणाला बसले आहेत. राज्य सरकारच्या मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने त्यांच्या मागण्या मान्य केल्या असल्या तरी त्याची अंमलबजावणी होईपर्यंत उपोषण सोडणार नाही, असा पवित्रा जरांगे यांनी घेतला आहे. त्यावरून छगन भुजबळांनी टीका केल्यानंतर जरांगे यांनी त्याला प्रत्युत्तर दिलं आहे.

ओबीसींच्या नावावर छगन भुजबळांनी सगळं खाल्लं असा आरोप मनोज जरांगे यांनी केला. ते म्हणाले की, "तुम्ही मराठ्यांच्या लेकरांवर का जळता? ओबीसी महामंडळ खाऊन टाकलं, महाराष्ट्र सदन खाल्लं. आता ओबीसींनी यांना ओळखलं आहे. वेळ पाहून हे महाविकास आघाडीचे कसे होता, महायुतीमध्ये कसे जातात, कधी अजितदादांसोबत जातात, हे सगळे पाहत आहेत. भुजबळांनी जे काही केलं ते आता ओबीसी समाज जाणतोय. त्यांना उतरती कळा लागली आहे. एखाद्यावर जळण्याची वृत्ती कुणाचीही नसावी."

मनोज जरांगे म्हणाले की, मराठा समाज मोठा आहे. एवढ्या मोठ्या समाजाला फक्त 10 टक्के आरक्षण दिलं आहे. ओबीसींची संख्या ही 60 टक्के आहे हे भुजबळांना कुणी सांगितलं? या दोन दिवसात भुजबळांना काय झालं? म्हातारपणात चांगली भूमिका घेईल वाटलं होतं, पण बळ गेलं तरी पीळ गेला नाही. आता यांना पोळी भाजायची असेल. पुतण्याला खासदार करायचे असेल.आपण यांना आता महत्व देणं कमी करावं. छगन भुजबळ म्हणाले होते की, "जात पडताळणी समिती ही महत्त्वाची समिती आहे. त्याच्यावर कुणीही दबाव आणता कामा नये. काही प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने नाकारली आहेत. ती दुरुस्त करून देतो असं काही आमदार म्हणाले आहेत.

## भाजप अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन डावपेच खेळतंय : उद्धव ठाकरे

■ मुंबई (दै. संध्या)



"भाजप निवडणुका जिंकण्यासाठी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन डावपेच खेळत आहे. मतदार याद्यांमधून लाखो नावे वगळायची आणि बोगस नावे घुसवून फेरफार करायचा, असाच कारभार सुरू आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांत गाफील न राहता प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या भागातील मतदार यादी तोंडपाठ ठेवून नावानिशी आणि चेहऱ्यानिशी प्रत्येक मतदारावर करडी नजर ठेवली पाहिजे," असा थेट इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला आहे. बीड विधानसभा मतदारसंघातील सुमारे 250 बूथ लेव्हल एजंट्सनी (बीएलए) शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मुंबईत भेट घेतली. आगामी विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तळागाळातील पक्षसंघटन मजबूत करणे आणि निवडणूक नियोजनाची रणनीती आखणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. यावेळी शिवसेना नेते अंबादास दानवे, अरविंद सावंत यांच्यासह स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. निवडणूक यंत्रणा आणि भाजपच्या कार्यपद्धतीवर जोरदार प्रहार करताना उद्धव ठाकरे म्हणाले, "लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला जनतेने मोठे यश दिले; मात्र त्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये निकाल वेगळे लागले. बोगस मतदार नोंदणीबाबत सर्वप्रथम केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या पतीने म्हणजेच अर्थतज्ज्ञ परकला प्रभाकर यांनी आवाज उठवला होता. लोकसभा ते विधानसभा या अवघ्या सहा महिन्यांच्या काळात तब्बल 45 लाख मतदार वाढवले गेले, ही वस्तुस्थिती आहे."

## सोलापुरात ८६ वर्षांच्या माजी नगरसेवकावर हल्ला, २५ वर्षांपूर्वीचा वाद भोवला



■ सोलापूर (दै. संध्या)

सोलापुरातील अतिशय उच्चभ्रू सोसायटीत गुरुवारी सायंकाळी थरारक घटना घडली. सिंधी समाजाच्या एका कार्यक्रमासाठी गेलेले माजी नगरसेवक तथा सिंधी समाजाचे माजी अध्यक्ष लालचंद नमोमल वाधवाणी यांच्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करुन त्यांना गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना गुरुवारी सायंकाळी सोलापुरातील गुरुनानक चौक परिसरारील सिंधी कॉलनीत घडली. या घटनेतील जखमी लालचंद वाधवाणी हे 86 वर्षांचे आहेत. ते सोलापुरात लक्ष्मी विष्णू सोसायटीत वास्तव्यास आहेत. त्यांच्यासोबत घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या हल्ल्यामागचे कारणदेखील आता समोर आले आहे. सिंधी समाजातीलच 65 वर्षीय प्रकाश किसनदास अडवाणी या इसमाने 25 वर्षांपूर्वीच्या वादाचा राग मनात धरून हा हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. जखमी लालचंद वाधवानी यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर संशयित आरोपी प्रकाश अडवाणी याच्या विरोधात सदर बजार पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 109 (1), 352 (3) शस्त्र अधिनियम 4, 25 नुसार गुन्हा दाखल झाला आहे. उपस्थितांमध्ये प्रचंड घबराट पसरली आणि एकच गोंधळ उडाला. उपस्थित काही जणांनी आरोपीला रोखण्याचा प्रयत्न केला असता तो हातातील शस्त्र घेऊन तिथून निघून गेला. जखमी वाधवाणी यांना उपस्थितांनी रक्तबंबाळ अवस्थेत तातडीने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

### जुन्या निर्णयाचा राग मनात

२५ वर्षांपूर्वी सिंधी समाजाच्या पातळीवर झालेल्या एका निर्णयावरून प्रकाश अडवाणी याच्या मनात तीव्र राग होता. त्यातूनच हा हल्ला झाल्याचा संशय आहे. हा हल्ला पूर्वनियोजित होता का? याचा शोध पोलीस घेत आहेत. भर कार्यक्रमात घडलेल्या या प्रकारामुळे सिंधी समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलीस ठाण्याचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहेत.

### सिंधी समाजाच्या कार्यक्रमात थरार

सिंधी समाजातील एका व्यक्तीच्या उठावणाचा कार्यक्रम गुरुनानक चौक परिसरातील सभागृहात गुरुवारी सुरू होता. वाधवाणी यांच्यासह अनेक समाजबांधव तिथे उपस्थित होते. कार्यक्रम सुरू असतानाच आरोपी प्रकाश अडवाणी दुचाकीवर तिथे आला. त्याने सोबत लांब धारदार शस्त्र आणले होते. कसलाही विचार न करता त्याने वाधवाणी यांना खाली ढकलून पायावर जोरदार वार केले. यात वाधवाणी गंभीर जखमी झाले.




## संपादकीय

# गोपाळकाला : एकतेचा, समतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश

भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना केवळ धार्मिक महत्त्व नाही, तर त्यामागे समाजाला दिशा देणारी मूल्यव्यवस्थाही दडलेली आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमीनंतर साजरा होणारा गोपाळकाला हा त्याच परंपरेचा सुंदर आविष्कार आहे. दही, दूध, लोणी, पोहे, फळे आणि विविध पदार्थ एकत्र करून तयार केला जाणारा काला आणि तो सर्वांनी मिळून प्रसाद म्हणून ग्रहण करण्याची परंपरा वरकरणी साधी वाटत असली, तरी त्यामागे 'एकत्र येऊन जगण्याचा' मोठा सामाजिक संदेश आहे. गोपाळकाला म्हणजे विविध घटकांचे एकत्रीकरण. प्रत्येक पदार्थाची चव वेगळी, स्वरूप वेगळे; पण एकदा ते एकत्र आले की त्यातून तयार होतो एक स्वादिष्ट काला. समाजाचेही असेच आहे. जात, धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती, विचारसरणी आणि सामाजिक स्तर यांमध्ये भेद असले तरी समाज म्हणून आपण एकत्र आलो, तरच विकासाची खरी चव अनुभवता येते. त्यामुळे गोपाळकाला हा केवळ कृष्णभक्तीचा उत्सव नसून सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे. श्रीकृष्णाच्या बाललीलांमध्येही सामूहिकतेचा हा भाव प्रकर्षाने दिसतो. गोकुळातील गवळ्यांच्या साथीने कृष्णाने केलेल्या लीला असोत किंवा दहीहंडी फोडण्याची परंपरा असो, त्यात 'मी'पेक्षा 'आपण' हा विचार केंद्रस्थानी आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि व्यक्तिकेंद्रित जीवनशैलीत हा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या यशाचा विचार करत असताना समाजातील इतर घटकांकडे दुर्लक्ष होऊ नये, हीच गोपाळकाला आपल्याला आठवण करून देतो. आज समाजासमोर अनेक आव्हाने आहेत. वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, महागाई, सामाजिक तणाव, डिजिटल माध्यमांमुळे वाढणारे गैरसमज आणि एकमेकांपासून दूर जाणारी माणसे ही चिंतेची बाब आहे. अशा परिस्थितीत सण साजरे करण्याची पद्धतही बदलण्याची गरज आहे. मोठमोठ्या आवाजातील संगीत, दिखाऊ सजावट, अनाठायी खर्च किंवा केवळ स्पर्धेपुरता उत्सव मर्यादित न ठेवता समाजोपयोगी उपक्रमांशी सण जोडणे, ही काळाची गरज आहे. गोपाळकाला साजरा करताना एखाद्या गरजू कुटुंबाला मदत करणे, अनाथ किंवा वंचित मुलांसोबत आनंद वाटणे, अन्नदान करणे, परिसर स्वच्छ ठेवणे, वृक्षारोपण करणे किंवा रक्तदानासारख्या उपक्रमांचे आयोजन करणे शक्य आहे. कारण उत्सवाचा खरा आनंद तेव्हाच वाढतो, जेव्हा आपल्या आनंदात दुसऱ्याचाही वाटा असतो. विशेषतः तरुण पिढीला या सणातून योग्य संदेश देणे आवश्यक आहे. दहीहंडीच्या उत्साहात धाडस, संघभावना आणि शिस्त यांचा समतोल राखला पाहिजे. उत्सवाच्या नावाखाली जीवितास धोका निर्माण करणारे प्रकार टाळले पाहिजेत. धार्मिक श्रद्धा आणि आधुनिक सुरक्षितता यांचा सुंदर मेळ घालून उत्सव साजरा झाला, तरच परंपरेचे खरे सौंदर्य टिकून राहील. गोपाळकाला आपल्याला आणखी एक महत्त्वाची गोष्ट शिकवतो संपत्तीची खरी किंमत तिच्या वाटण्यात आहे. एका भांड्यात मिसळलेल्या पदार्थांप्रमाणे समाजातील प्रत्येक घटकाची भूमिका महत्त्वाची आहे. कोणताही घटक कमी-अधिक नसतो. प्रत्येकाच्या सहभागातूनच समाज समृद्ध होतो. म्हणूनच गोपाळकाला हा समतेचा आणि परस्परावलंबित्वाचा संदेश देणारा उत्सव आहे. आजच्या काळात आपल्याला श्रीकृष्णाच्या बासरीपेक्षा त्याचा सामाजिक समतेचा सूर ऐकण्याची गरज आहे. दहीहंडी फोडण्यापेक्षा मनामनांमधील भिंती फोडण्याची गरज आहे. काला वाटण्यापेक्षा प्रेम, आपुलकी आणि माणुसकी वाटण्याची गरज आहे. गोपाळकाला हा केवळ एका दिवसाचा उत्सव न राहता 'एकत्र जगण्याची संस्कृती' बनला, तर त्याचा खरा अर्थ साकारेल. समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन, भेदाभेद विसरून आणि 'माझ्यासाठी'ऐवजी 'आपल्यासाठी' या भावनेने पुढे जाण्याचा संकल्प आपण या निमित्ताने केला, तर गोपाळकाल्याचा उत्सव खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल.

## संस्कृत सुभाषित

न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।
नेन्धनेन जयेदग्निं, न पानेन जयेत् सुरा ।।

अर्थ : अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

## गुरु वचन

### स्वार्थ

राजा वीरेंद्रसिंह एकदा शिकारीला निघाले होते. शिकार आणि घोडदौड हे त्यांच्या आवडीचे विषय होते. नेहमीप्रमाणे लवाजमा घेऊन वीरेंद्रसिंह जंगलच्या रस्त्याला लागले. गाव मागे पडले अन् जंगलाचा रस्ता सुरू झाला. राजाने पाहिलं तर समोर एक वृद्ध गृहस्थ कसले तरी रोप लावत होता. राजाला आश्चर्य वाटले. त्याने विचारले, 'म्हातारबा, कसले रोप लावताहात?' म्हातारा म्हणाला, 'राजा, आरं मी बदामाचं झाड लावतोया.' राजा म्हणाला, 'ते खरं म्हातारबा, पण त्याचा तुम्हाला काय उपयोग? हे झाड वाढणार कधी अन् त्याला बदाम लागणार कधी? कदाचित तुम्ही तेव्हा असणारही नाही. कशाला एवढे कष्ट घेत आहात?' म्हातारा शांतपणे म्हणाला, ''ते मला कळतंया रं ! पण स्वत:च्या पोटापुरतं पाहणारा मनुष्य नीच असतो. मला फळं मिळाली नाहीत तर काय झालं? कुणाला तरी मिळतीलच ना !''

कथा उपदेश : स्वार्थी माणूस स्वत:चाच विचार करतो.

## उपदेशकथा

### आध्यात्मिक आणि भौतिक धन एकत्र मिळत नाही

संसारात दोन प्रकारचे धन असते. भौतिक धन आणि दुसरे आध्याात्मिक धन. मनुष्याचा स्वभाव आहे की, तो जास्तीत जास्त धन कमवू इच्छितो. एखादी व्यक्ती सोने, चांदी, रूपयांचा ढिग लावल्याने धनवान म्हटला जातो. तर कोणी उपाशी, तहानलेला राहूनही धनवान म्हटला जातो. वास्तवात धनवान दोघेही आहेत. एक भौतिक धनाचा धनी आहे तर दुसरा अध्याात्मिक धनाचा धनी आहे.

शास्त्र आणि पुराण सांगातात की, दोन्ही धनात अध्यात्म रूपी धन जास्त श्रेष्ठ आहे. कारण हे धन कोणी चोरून घेऊ शकत नाही. ज्याच्याकडे अध्यात्म रूपी धन असते तो निश्चिंत असतो. त्याला कोणत्याही प्रकारची चिंता आणि भीती नसते. संसारात कोणतीही व्यक्ती अशी नाही जी एकत्र या दोन्ही संपत्तीचे सुख प्राप्त करू शकेल.

अध्यात्म आणि भौतिक धन दोन्ही दोन नावासमान आहेत. दोन्ही नावांतून एकाचवेळी प्रवास करता येत नाही, हे आपल्याला चांगल्याप्रकारे ठाऊक आहे. असे करण्याचा प्रयत्न केला तर बुडणे निश्चित असते. आपल्याला अध्याात्मिक धन अर्जित करून ईश्वराचे ऋण फेडायचे आणि जीवन-मरणाच्या चक्रातून मुक्ती मिळावायची की भौतिक धन अर्जित करून सांसारिक सुखाचा आनंद घ्यायचा आणि वारंवार जीवन-मरणाच्या चक्रात अडकून पापफळ प्राप्त करायचे, हे आपल्या हाती आहे.

भागवत् म्हणते ईश्वर ज्याच्यावर प्रेम करतो त्याचे सर्वकाही हिरावून घेतो. सर्वकाही हिरावून घेण्याचा अर्थ आहे सांसारिक सुख हिरावून घेणे. कबीर दास, तुलसीदास, रहीम, मीराबाई, सूरदास, करमैतीबाई याची उदाहरणे आहेत.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:वज्र १२:४६:२५ |
| ५ सप्टेंबर २०२६ | करण:तैतिल ११:०४:४१ |
| शनिवार | करण:गर २१:५३:५७ |
| विक्रम संवत्- २०८२ | सूर्य:सिंह |
| आषाढ शके | चन्द्र:मिथुन१०:१८:०३ |
| संवत्- १९४८ | हिजरी सन् - १४४८ |
| संवत्सर -पराभवनाम | मुस्लिम मास - रबिलावल |
| अयन- दक्षिणयन | तारीख - २२ |
| मास- आषाढ | विशेष |
| ऋतु- सौर शरद | गोपाळकाला |
| कृष्ण पक्ष | अश्वत्थमारुती पूजन |
| तिथि:नवमी २१:५३:५७ | शिक्षक दिन |
| नक्षत्र:मृगशिर्षा | निकालस महाराज |
| २१:३०:३१ | पुण्यतिथी - नागपूर |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०६०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | 7 | 6 | 3 | 2 | 8 | | |
| | | | 8 | 1 | | | | 3 |
| 4 | 3 | | | | 5 | 1 | | |
| 6 | | | 2 | | 3 | 7 | | |
| | | | | 6 | | | | |
| | | 3 | 5 | | 9 | | | 2 |
| | | 4 | 3 | | | | 6 | 1 |
| 9 | | | | 7 | 1 | | | |
| | | 1 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०५९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 9 | 8 | 6 | 5 | 7 | 3 | 1 |
| 6 | 3 | 7 | 9 | 2 | 1 | 4 | 5 | 8 |
| 1 | 8 | 5 | 3 | 7 | 4 | 2 | 9 | 6 |
| 4 | 7 | 1 | 6 | 5 | 9 | 8 | 2 | 3 |
| 8 | 9 | 6 | 1 | 3 | 2 | 5 | 7 | 4 |
| 5 | 2 | 3 | 4 | 8 | 7 | 6 | 1 | 9 |
| 3 | 5 | 8 | 7 | 9 | 6 | 1 | 4 | 2 |
| 7 | 6 | 4 | 2 | 1 | 3 | 9 | 8 | 5 |
| 9 | 1 | 2 | 5 | 4 | 8 | 3 | 6 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११८७ – सेव्हर्न नदीखालून जाणारा ४ मैल (सव्वासात कि.मी.) लांबीचा बोगदा कार्यान्वित झाला.
- १९५८ – खंबायतजवळ लुनेज येथे खनिज तेल सापडले.
- १९७२ – ब्लॅक सप्टेंबर या दहशतवादी अरब गटाने म्युनिक ऑलिम्पिक स्पर्धा सुरु असताना ११ इस्त्राईली खेळाडूंची हत्या केली.

### राष्ट्रीय

- २००२ – भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष कृष्णास्वामी कस्तुरीरंगन यांना 'ऑफिसिये द ला लांजनदोनर' हा फ्रेंच बहुमान देण्यात आला.

### जन्म

- ११८७ – लुई आठवा, फ्रांसचा राजा.
- १६३८ – लुई सोळावा, फ्रांसचा राजा.
- १८२६ – जॉन विस्डन, ब्रिटीश क्रिकेटरसिक, प्रकाशक.
- १८४७ – जेसी जेम्स, अमेरिकन दरोडेखोर.
- १८५७ – कॉन्स्टेन्टिन त्सियाकोव्स्की, रशियन संशोधक.
- १८८८ – सर्वपल्ली राधाकृष्णन, भारतीय राष्ट्रपती.
- १८९५ – काकबा प्रियोळकर, संशोधक.

### निधन

- ११६५ – निजो, जपानी सम्राट.
- १६५९ – महाराणी सईबाई, शिवाजी महाराजांची पत्नी.
- १८७७ – क्रेझी हॉर्स, अमेरिकेतील सू जमातीचा नेता.
- १९०६ – लुडविग बोल्टझमन, ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ.
- १९९७ – मदर तेरेसा, समाजसेविका.
- २००४ – य.श्री. सहस्त्रबुद्धे, भारतीय भू-सर्वेक्षण खात्याचे माजी प्रमुख.

## : SMS :

garmi me ek ladka bola - "Bhai AC lagwa le." Dusra bola - "AC ka kharcha kaun dega?" Pehla: "Tu tension mat le, bijli ka bill to waise bhi Papa bharte hai... unko pata hi nahi chalega AC kiska hai."

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.२ | २३ |
| अहमदनगर | ३१.९ | २२.५ |
| अकोला | ३४.६ | २५.५ |
| अमरावती | ३२.९ | २४.८ |
| बीड | ३२.९ | २५.८ |
| भंडारा | २७ | २४.७ |
| बुलढाणा | ३९ | २६.२ |
| चंद्रपूर | ३२.८ | २६ |
| चेन्नई | ४१.३ | ३० |
| नवी दिल्ली | ३८.९ | २७.६ |
| धुळे | ३५ | २४.९ |
| गोंदिया | २६.३ | २३.७ |
| जळगाव | ३३.२ | २५.२ |
| कोल्हापूर | २९.१ | २२.९ |
| लातूर | ३१.५ | २३.६ |
| मुंबई | ३३.४ | २७.६ |
| नागपूर | २९.८ | २५.२ |
| नांदेड | ३२.८ | २४.५ |
| नंदूरबार | ३२.१ | २४.२ |
| नाशिक | ३०.४ | २३.२ |
| पुणे | २६.७ | २२.१ |
| पंढरपूर | ३३.७ | २३.६ |
| सातारा | ३०.९ | २२.४ |
| सांगली | ३१.७ | २२.९ |
| सोलापूर | ३३.७ | २४.१ |
| वर्धा | ३३.७ | २५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व. बौद्धिक चळवळीचे नेतृत्व आपण कराल. त्यातून आपली प्रतिमा उंचावेल.

**वृषभ :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम. जुन्या आठवणी, नव्या मित्रांची संगत यातून भरीव कामगिरी करू शकाल.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व. घरात कुटुंबियांच्या तब्येती व काही विचित्र प्रश्न यातून सफाईने मार्ग काढावा लागेल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर. आयुष्याला वळण देणारे ठरावेत असे प्रस्ताव आपले उत्पन्नही वाढविणारे ठरतील.

**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व. कोणत्याही वादविवादात मध्यस्थी करू नका. शब्दप्रयोग व पैसा यांचा वापर विचारपूर्वक करा.

**कन्या :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा : उत्तर. घरात काही मंगलकार्ये ठरतील. कार्यक्रमानिमित्त घरात पाहुण्यांची वर्दळ राहील.

**तुळ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व. मैत्रिणीसह होणाऱ्या गप्पातून ज्ञानात भर पडेल. काही वैचारिक चर्चा हितकारक ठरतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम. घरातले मंगल वातावरण, नशीबाची अनुकूल साथ हे सर्व कसे चांगले जमून येणार आहे.


**धनु :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व. अनाठायी खर्च टाळा. खर्च करताना आपण काही अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालत नाही ना याची काळजी घ्या.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व. घरगुती आजारपण, नाराज शेजारी, पाहुण्यांचे मुक्काम आणि स्वत:ची कामाची घाई यातून वेळ काढावा लागेल.

**कुंभ :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर. प्रवासातून चांगले अनुभव आपल्या व्यवसायात बदल करायला लावतील. संततीशी वादाचे प्रसंग येतील.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : उत्तर. नोकरीच्या अपेक्षा असणाऱ्यांना अपेक्षित अशी नोकरी मिळेल. बदल लाभदायक ठरतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०६०



### आडवे शब्द

१. भागवत संप्रदायाचा पाया आणि कळस रचणारे संत
७. पांडवांपैकी माद्रीपुत्र
११. अभिनेता
१२. नमस्कार, वंदन
१२अ. त्रिगुणांपैकी एक
१३. संतोष, तृप्ती
१४. सोने
१६. ओंकारातील तिसरा ध्वनी
१८. व्यर्थ भटकंती
१९. राबता
२०. सूर्याचे एक नाव
२१. पर्ण, विडा
२३. एकटा
२४. चाकरी
२५. तात्काळ, ताबडतोब
२७. नडगीमागचा मांसल भाग
२८. रात्रंदिवस
३०. माळ (हिंदी)
३२. ढीग
३३. झीज, नुकसान
३४. वाढलेला व्याप
३५. वृक्ष
३६. पार्वतीचे एक नाव
३८. भयानक
४०. वृद्धत्व, थोडे
४२. कपडालत्ता
४४. तमाशातील प्रश्नोत्तरे
४६. पिकावरील कर
४८. पुष्प, फूल
४९. धमनी, नाडी
५१. माल साठविण्याची जागा, ५३. मालवाहक
५४. जमिनीचे दान, विनोबा भावे यांची चळवळ
५६. केस काळे करण्याचे साधन
५८. घाबरणारा, कच खाणारा
५९. भीती, कचर
६१. उलट, विरुद्ध
६२. दामबोध लिहिणारे
६५. जास्वंद
६८. मऊ
७०. थोडेसुद्धा
७१. झकास, छान
७२. व्रत, नेम
७५. घर, संस्था इ.चे व्यवस्थापन
७७. अकस्मात
७८. पंचामृतातील दोन पदार्थ
७९. गीत, गाणे
८०. नागरिक, जनता

### उभे शब्द

१. '---- -- -- सांगे गीता भगवंता' आशा भोसलेंच्या आवाजात मायमराठीची विनंती
२. जोर, इंग्रजीत जाळे
३. निमग्न
४. अरण्य
५. कौसल्यापुत्र
६. दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
७. गव्हाचे पीठ
८. शासनसंस्था
९. उपस्थित
१०. दैनिक वार्तापत्र
१३. सूट
१५. पुरुष
१६. थट्टा
१७. मगज
१९. दिवस
२०. झुणक्याची साथ
२२. एखाद्याबद्दलची मनातील अढी, मत्सर
२४. कागदी चलन
२६. बेडकाचे ओरडणे
२७. भरपेट
२८. अशा प्रकारचा
२९. अंदाज, अटकळ
३१. आवडता, प्रिय
३४. अनुमती
३६. मेहरबानी
३७. नारळाचे झाड
३९. शपथ
४०. जोखीम, जिम्मेदारी
४१. उसाचा दाट रांधा (मळी)
४३. 'पोटापुरता -- पाहिजे, नको पिकाया पोळी'
४५. सीतेचे वडील
४७. समारंभ
४८. सोपे
५०. टोचणारे दु:ख
५२. घराणे
५४. राजा
५५. नम्रतेने मान खाली घातलेला
५७. फुलातील रज:कण
६०. कार्यप्रमुख
६३. मंत्रीमंडळ
६४. पक्ष्यांचा आवाज
६६. सक्षम, भांडे
६७. जेवणावर आडवा हात!
६९. करपलेला भाग
७१. चिंतन
७३. गहू व हरबरा डाळीचे पीठ
७४. ठसा, मुद्रा
७६. शपथ
७७. शेळी

### जम्बो शब्दकोडे क्र. १०५९ चे उत्तर

आडवे उत्तर : १.व्यापार ५.मातोश्री ७.नजरानजर ११.रासगरबा १२.युवक १३.जागा १४.मायना १५.मदत १७.राखण १९.वण २०.वावडी २१.सुकामेवा २३.लावणी २४.सावरकर २६.समरस २९.भाराभर ३०.परतविणे ३१.अरुण ३२.पार ३३.रवा ३४.पाट ३५.रस ३६.जयजयकार ३९.रवाळ ४०.खानसामा ४१.कलकल ४२.यातना ४४.तरस ४६.तन ४७.विप्र ४८.ताकद ५०.सदा ५१.धनवान ५२.वाद ५४.वेरूळ ५५.बाकदार ५८.दरवेश ६१.मार ६२.पोरगा ६३.काक ६५.माग ६७.पाक ६८.सनई ६९.परवानगी ७०.नाच ७१.चिदा ७२.क्रूर ७३.सोरट ७४.आदरसत्कार ७६.तहहयात ७७.कणखर ७८.टर

उभे उत्तर : २.पारायण ३.रसना ४.दरवाडणी ६.श्रीयुत ७.नकलाकार ८.राजा ९.नगारा १०.रक्षण १४.मावसभाऊ १६.दशावतार १८.खबर २०.वावर २१.सुकणे २२.वासरू २३.लाभदायक २४.सार २५.रविवार २७.मण २८.समसमान ३०.परकाया प्रवेश ३१.अट ३२.पाय ३४.पाळत ३५.रसातल ३६.जलयान ३७.जल ३८.रत ४०.खासदार ४३.नाताळ ४५.रसवान ४९.दबा ५१.धसका ५३.नरमाई ५६.कमाल ५७.पगारदार ५९.वेग ६०.मदनबाण ६२.पोक ६४.कसरत ६६.खारट ६७.पाचर ६९.परत ७०.नाद ७१.चित्कार ७३.सोया ७४.आर ७५.सट

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# मॅग्नमच्या ग्लोबल बिझनेस सोल्युशन्स सेंटरचे वाकडमध्ये मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स क्षेत्रात पुणे देशात अग्रेसर असणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

■ मॅग्नमच्या केंद्रातून एक हजारांहून अधिक रोजगार; कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित तंत्रज्ञान व लॉजिस्टिक्सचा वापर

■ पुणे (दै. संध्या)

ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्सचे (जीसीसी) प्रमुख केंद्र म्हणून पुणे वेगाने विकसित होत असून, पुण्यात आतापर्यंत १३० पेक्षा अधिक जीसीसी कार्यरत झाले आहेत. आगामी एका वर्षात ही संख्या ८०० पेक्षा अधिक होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. जीसीसी क्षेत्रात पुण्याने देशात प्रथम क्रमांकाचे स्थान मिळवावे, हे राज्य शासनाचे लक्ष्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

वाकड येथील ईओएन वेस्ट आयटी पार्कमध्ये मॅग्नम आईस्क्रीम कंपनीच्या ग्लोबल बिझनेस सोल्युशन्स सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला आमदार अमित गोरखे, शंकर जगताप, उद्योग, गुंतवणूक व सेवा विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, मॅग्नम आईस्क्रीम कंपनीचे मुख्य वित्तीय अधिकारी अभिजीत भट्टाचार्य, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह उद्योजक आणि कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र हे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्ससाठी देशातील प्रमुख आणि पसंतीचे गुंतवणूक केंद्र बनले असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुण्यात जागतिक कंपन्यांकडून ग्लोबल व्यवसाय सेवा केंद्रे सुरू करण्याला मिळणारा प्रतिसाद हा शहरातील उद्योगपूरक वातावरण आणि उपलब्ध कुशल मनुष्यबळाची पावती आहे. मॅग्नमचे पुण्यातील केंद्र एक हजारांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करणार आहे. त्यासोबतच अप्रत्यक्ष रोजगारालाही चालना मिळणार आहे. कंपनीच्या जागतिक व्यवसाय प्रक्रिया अधिक सक्षम करण्यासाठी या केंद्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित तंत्रज्ञान, लॉजिस्टिक्स आणि अन्य आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला



जाणार आहे. उत्पादन, वितरण आणि ग्राहक अनुभवाशी संबंधित प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग होईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. शासन आणि उद्योग क्षेत्राने एकत्रितपणे काम केल्यास गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देणारी सक्षम परिसंस्था निर्माण होते. राज्यात गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांना आवश्यक ते सहकार्य आणि अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. श्री. फडणवीस म्हणाले, मुंबईतील प्रादेशिक मुख्यालयासोबत पुण्यात सुरू झालेले हे ग्लोबल बिझनेस सोल्युशन्स सेंटर मॅग्नमच्या महाराष्ट्रातील विस्ताराला नवी दिशा देणारे ठरेल. पुण्यातील औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा अधिक सक्षम करून ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्ससाठी आणखी आकर्षक केंद्र बनविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. हिंजवडीसह पुण्यातील आयटी क्षेत्राशी संबंधित पायाभूत सुविधांचे प्रश्न सोडविण्यावर शासनाचे विशेष लक्ष आहे. उद्योग आणि गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद ही त्याचीच परिणीती आहे. गुंतवणुकीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करण्यास शासनाचे प्राधान्य असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. डॉ. पी. अनबलगन म्हणाले, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स ही केवळ कार्यालये नसून देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारी महत्त्वाची इंजिने आहेत. भारताने जगातील आघाडीचे जीसीसी केंद्र म्हणून आपले स्थान निर्माण केले असून, महाराष्ट्र आणि विशेषतः पुणे या वाढीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. पुण्यात गेल्या १५ महिन्यांत जीसीसीसाठी सुमारे ६० लाख चौरस फूट जागेची मागणी झाली आहे. गेल्या १८ महिन्यांत राज्यात १३० नवीन अथवा विस्तारित जीसीसी युनिट्स सुरू झाली आहेत. आगामी काळात राज्यात ४०० जीसीसी कंपन्या आणि ७०० हून अधिक युनिट्स उभारण्याचे उद्दिष्ट आहे. पुण्यात सध्या ३० पेक्षा अधिक देशांतील कंपन्या २० विविध क्षेत्रांत कार्यरत असून, या क्षेत्रात सुमारे १० हजार मनुष्यबळ कार्यरत आहे. जीसीसी कंपन्यांनी शासनाच्या विविध प्रोत्साहन योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक ते सहकार्य केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### बीरेंद्र सिंह धनोआ यांना 'थोरले बाजीराव पेशवे शौर्य पुरस्कार' जाहीर

■ राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते ९ सप्टेंबर रोजी पुरस्कार प्रदान सोहळा



पुणे : दैनिक संध्या

थोरले बाजीराव पेशवे यांच्या ३२६व्या जयंतीनिमित्त थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा 'थोरले बाजीराव पेशवे शौर्य पुरस्कार २०२६' एअर चीफ मार्शल बीरेंद्र सिंह धनोआ यांना जाहीर झाला आहे. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते बुधवार, दिनांक ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता कोथरूड येथील बाल शिक्षण मंदिर, मएसो सभागृहात पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे सचिव कुंदनकुमार साठे यांनी दिली. या कार्यक्रमासाठी एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले, पेशव्यांचे वंशज पुष्करसिंह पेशवा आणि बेलराईज इंडस्ट्रीज लिमिटेडच्या कार्यकारी संचालिका सुप्रिया बडवे, प्रमुख वक्ते डॉ. आदित्य अभ्यंकर यांची उपस्थिती राहणार आहे. बीरेंद्र सिंह धनोआ यांनी जून १९७८ मध्ये भारतीय वायुदलाच्या लढाऊ वैमानिक दलात कारकीर्दीस सुरुवात केली. मिग-२१, जग्वार, मिग-२९ आणि सुखोई-३० एमकेआय यांसह विविध लढाऊ विमानांचे त्यांनी उड्डाण केले असून, तीन हजारांहून अधिक तासांचा उड्डाणाचा अनुभव आहे. ते 'अ' श्रेणीचे उड्डाण प्रशिक्षक होते. १९९९च्या कारगिल युद्धात धनोआ हे मिग-२१ लढाऊ विमानांच्या अग्रभागी तैनात असलेल्या हल्लेखोर लढाऊ विमानांच्या पथकाचे प्रमुख होते. त्यांच्या नेतृत्वाखाली डोंगराळ प्रदेशात दिवस-रात्र हवाई हल्ल्यांच्या मोहिमा राबविण्यात आल्या. या शौर्यपूर्ण नेतृत्वासाठी त्यांना युद्ध सेवा पदक आणि वायू सेना पदकाने गौरविण्यात आले. वायुदलातील प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी लढाऊ हवाई कारवाया, युद्धनियोजन, गुप्तचर विभाग तसेच पूर्व, पश्चिम आणि दक्षिण-पश्चिम वायुदल कमांडमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. ते वायुदलाचे उपप्रमुखही होते. १ जानेवारी २०१७ रोजी त्यांनी भारतीय वायुदलाचे २२वे प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. ३० सप्टेंबर २०१९पर्यंत त्यांनी ही जबाबदारी सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात फेब्रुवारी २०१९मध्ये बालाकोट येथे हवाई कारवाई करण्यात आली. मे २०१९मध्ये त्यांनी तिन्ही संरक्षण दलांच्या प्रमुखांच्या समितीचे अध्यक्षपदही स्वीकारले. धनोआ यांना परम विशिष्ट सेवा पदक, अति विशिष्ट सेवा पदक, युद्ध सेवा पदक आणि वायू सेना पदक अशा विविध सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. लढाऊ वैमानिकापासून वायुदल प्रमुखापर्यंत विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडलेली त्यांची कारकीर्द शौर्य आणि नेतृत्वासाठी उल्लेखनीय ठरली आहे.

### विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत सर्व मतदारसंघांमध्ये जनजागृती मोहीम

पुणे : दैनिक संध्या

जिल्ह्यातील विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत एएसडीडी यादीमधील जास्तीत जास्त मतदारांची नोंदणी व्हावी याउद्देशाने सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये ७ ते ३० सप्टेंबर या कालावधीत विशेष जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेद्वारे १ ऑक्टोबर २०२६ रोजी अठरा वर्षे पूर्ण करीत असलेल्या तसेच तृतीयपंथीय व्यक्ती, अल्पसंख्यांक जनसमुदाय, महिला, दिव्यांग यांचे मतदार यादीत नोंदणी होण्यासाठी ही शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीनंतर २८ लाख ६६ हजार ४६१ मतदारांची नावे अनुपस्थित, स्थलांतरित, मयत व दुबार यादीमध्ये समाविष्ट झाली आहेत. शिबिरांमध्ये याबाबत जनजागृती करुन जास्तीत जास्त मतदारांची नावे अंतिम यादीत समाविष्ट होतील यासाठी स्वीप अंतर्गत हा उपक्रम घेण्यात येणार आहे, असे उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी कळविले आहे.

### नवीन मालिकेतील पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

पुणे : दैनिक संध्या

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड (नवीन इमारत, मोशी) येथे चारचाकी वाहनांसाठी 'NS' ही नवीन नोंदणी मालिका लवकरच सुरू करण्यात येणार आहे. आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक विहित शुल्क भरून घेऊ इच्छिणाऱ्या वाहनमालकांनी ८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० या वेळेत विहित नमुन्यात अर्ज करावा. अर्जासोबत डीडी, पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रती सादर कराव्यात. डीडी DY.R.T.O. PIMPRI CHINCHWAD यांच्या नावे पुणे येथील नॅशनलाईज्ड/शेड्युल्ड बँकेचा असावा. चारचाकी वाहन क्रमांकाची यादी ९ सप्टेंबर २०२६ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. लिलावासाठी जास्त रकमेचा डीडी सादर करावयाचा असल्यास तो सीलबंद पाकिटात ९ सप्टेंबर रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत जमा करावा. लिफाफे त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील. विहित शुल्कापेक्षा अधिक रकमेचा डीडी सादर करणाऱ्या पात्र अर्जदारास संबंधित पसंती क्रमांक वितरीत केला जाईल. लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरित क्रमांक ऑनलाइन पद्धतीने आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येतील. आरक्षित केलेला नोंदणी क्रमांक बदलता येणार नाही. तसेच आरक्षणाच्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत वाहन नोंदणीसाठी सादर न केल्यास आरक्षित क्रमांक आपोआप रद्द होऊन शुल्क सरकारजमा होईल. भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत अथवा समायोजित करता येणार नाही. आकर्षक क्रमांकाच्या शुल्कात बदल झाल्यास त्यावेळी लागू असलेले विहित शुल्क आकारण्यात येईल.

## साध्या-साध्या गोष्टींतून विनोद टिपता आला पाहिजे

■ पुणे (दै. संध्या)

ज्येष्ठांनी शिकणे थांबवले तर त्यांना भवितव्य नाही. जगण्यात अस्सलियत असेल तर गझलेत गझलियत आपोआप येते. साध्या-साध्या गोष्टींतून विनोद टिपता आला पाहिजे. हास्यातून आयुष्याला न्याय देता येतो, असे मत ज्येष्ठ गझलकार म. भा. चव्हाण यांनी व्यक्त केले.



■ ज्येष्ठ गझलकार म. भा. चव्हाण यांचे मत

■ आदिश जैन फाउंडेशनतर्फे हास्यकविता महोत्सवात हास्यकवी बंडा जोशी यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद

आदिश जैन फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त नवी पेठेतील लोकमान्य वाचनालयाजवळील अक्षरवेल सभागृहात हास्यकविता महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ हास्यकवी बंडा जोशी, श्रीपाल ललवाणी, वंदना ललवाणी, आदिश जैन फाउंडेशनच्या प्रमुख, कवयित्री मृणाल जैन उपस्थित होते.

आदिश जैन फाउंडेशनतर्फे खुली हास्यकविता लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला देश-विदेशातून मोठा प्रतिसाद मिळाला. प्रसिद्ध हास्यकवी बंडा जोशी यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

महोत्सवाच्या पहिल्या सत्रात स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी विजेत्या हास्यकवितांचे अभिवाचनही करण्यात आले. हास्यकविता स्पर्धेत प्रथम क्रमांक राजेश पारसनीस (सुरत), द्वितीय क्रमांक कल्पना मोडक (ठाणे), तर उत्तेजनार्थ अनिल घोटकर (पुणे) आणि शुभदा अभ्यंकर (पुणे) यांनी मिळविला. गझल स्पर्धेत प्रथम क्रमांक हेमंत डांगे (कोल्हापूर), द्वितीय क्रमांक प्रविण बोधुलकर (पनवेल), तर उत्तेजनार्थ मनोहर वाळींबे (ठाणे) यांना पारितोषिक मिळाले. विडंबन स्पर्धेत प्रथम क्रमांक मुकुंद देशपांडे (वर्धा), द्वितीय क्रमांक मकरंद घाणेकर (पुणे), तर उत्तेजनार्थ वर्षा बालगोपाल (पुणे) आणि डॉ. मनोज वराडे (सांगली) यांना गौरविण्यात आले. बंडा जोशी म्हणाले, कविता लिहिणे ही सर्वांत अवघड गोष्ट आहे. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय मांडणे अत्यंत कठीण असते. कविता लिहिण्यासाठी कला, कौशल्य आणि समृद्ध शब्दसंपदा आवश्यक असते. योग्य शब्दांचा योग्य ठिकाणी वापर करता आला पाहिजे.

## कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित पतमानांकनापासून पर्यावरणपूरक अग्निशमनापर्यंत

**महाराष्ट्रातील युवा नवोन्मेषक 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो'च्या टॉप-४० मध्ये**

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रातील तीन युवा नवोन्मेषकांनी 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो' या राष्ट्रीय नवोन्मेष उपक्रमाच्या टॉप-४० मध्ये स्थान मिळविले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आर्थिक समावेशन आणि पर्यावरणीय शाश्वतता या क्षेत्रांतील स्थानिक समस्यांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाय शोधण्याचे काम हे युवा नवोन्मेषक करीत आहेत.

सॅमसंगच्या या प्रमुख सामाजिक दायित्वाधारित नवोन्मेष उपक्रमाची ही पाचवी आवृत्ती असून, १४ ते २२ वर्षे वयोगटातील तरुणांना वास्तविक जीवनातील समस्या ओळखून त्यावर तंत्रज्ञानाधारित उपाय विकसित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. यंदाच्या स्पर्धेतील 'एआय लिव्हिंग फॉर इंडिया' आणि 'एन्व्हायर्नमेंटल सस्टेनेबिलिटी' या दोन विषयांमध्ये महाराष्ट्रातील युवा नवोन्मेषकांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मुंबईतील १६ वर्षीय श्रीहान झा यांनी लघु व्यवसायांसाठी आर्थिक सुविधा अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपक्रम विकसित केला आहे. हस्तलिखित बिले आणि यूपीआय व्यवहारांचे विश्लेषण करून पतमानांकन तयार करणारे संकेतप्रणालीवर आधारित उपयोजन त्यांनी विकसित केले आहे. त्याला कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आर्थिक संवाद प्रणालीची जोड देण्यात आली आहे. या माध्यमातून लघु व्यावसायिकांना अधिक औपचारिक आर्थिक नोंदवही तयार करण्यास तसेच कर्जप्राप्तीची शक्यता वाढविण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

मुंबईतील २१ वर्षीय योगिता किशोर सुवासिया यांनी वाढत्या कापड कचऱ्याच्या समस्येवर लक्ष केंद्रित केले आहे. टाकाऊ कापडाचे जीवनशैलीशी संबंधित उपयोगी उत्पादनांमध्ये रूपांतर करणारी पुनर्वापराधारित डेनिम परिसंस्था त्यांनी विकसित केली आहे. कापडाचा वापर किती आणि कुठे झाला, याचा मागोवा घेण्यासाठी साहित्याचा मागोवा ठेवण्याची व्यवस्था तसेच महिला कारागिरांसोबत भागीदारी करून कापडाचे उपयुक्त आयुष्य वाढविण्याचा प्रयत्न या उपक्रमात करण्यात आला आहे.

या तीनही नवोन्मेषांमधून आर्थिक समावेशन, पर्यावरण संरक्षण, शाश्वत साहित्याचा वापर आणि पुनर्वापराधारित रचना यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील समस्यांकडे महाराष्ट्रातील तरुण कोणत्या दृष्टिकोनातून पाहत आहेत, हे स्पष्ट होते. आपल्या परिसरातील दैनंदिन समस्यांचे निरीक्षण करून त्यावर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने व्यवहार्य उपाय शोधण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे.

पुण्यातील १७ वर्षीय पालाश गांग यांनी अग्निशमन क्षेत्र अधिक पर्यावरणपूरक करण्याच्या दिशेने संशोधन केले आहे. पारंपरिक पीएफएएस-आधारित अग्निशमन फेसाऐवजी जैवविघटनशील पर्याय विकसित करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. माशांच्या खवल्यांपासून मिळणाऱ्या टाकाऊ पदार्थांचा वापर करून तयार केलेल्या या पर्यायामध्ये कोलेजन-चिटोसानच्या साहाय्याने इंधनाच्या वाफांवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे हानिकारक पेट्रो-रसायनांवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण प्रयोग मानला जात आहे.

## डीजे-डॉल्बीवर पूर्णत: बंदीची मागणी योग्यच !

**'आरपीआय'चे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांची भूमिका**

■ पुणे (दै. संध्या)

सार्वजनिक उत्सवांमध्ये वाजवल्या जाणाऱ्या उच्च क्षमतेच्या डीजे आणि डॉल्बी साऊंड सिस्टिममुळे नागरिकांच्या आरोग्यावर अत्यंत गंभीर आणि जीवघेणे दुष्परिणाम होतात. हे धोके लक्षात घेता राज्यभरातील सार्वजनिक उत्सवांमध्ये डीजे-डॉल्बीच्या वापरावर कायमस्वरूपी कडक बंदी घालण्याच्या मागणीचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी समर्थन केले आहे. डीजे सिस्टिम सुरू होताच ध्वनीची तीव्रता १०० ते १३० डेसिबेलच्या वर जाते, जी कायदेशीर मर्यादा ५५ ते ७५ डेसिबेलपेक्षा कित्येक पटीने जास्त आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार सलग काही वर्षे उत्सव काळात शहरातील ९० टक्क्यांहून अधिक भाग उच्च ध्वनि प्रदूषणाच्या विळख्यात सापडतात. या तीव्र आवाजाच्या कंपनांमुळे आणि लेझर लाईट्समुळे दरवर्षी नागरिक आणि बालकांना कायमचे बहिरेपण, दृष्टीदोष व मानसिक अपंगत्व येते; ही बाब गंभीर असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.



डीजेच्या अत्यंत उच्च आवाजामुळे कार्डियाक अरेस्ट येऊन नागरिकांचे प्राण गेल्याच्या घटना घडल्या आहेत. सांगली येथील गणेश विसर्जन मिरवणुकीत ३२ वर्षीय शेखर पावशे व ३५ वर्षीय प्रवीण शिरतोडे या युवकांचा डीजेच्या तीव्र आवाजामुळे हृदयविकाराचा झटका येऊन दुर्दैवी मृत्यू झाला होता. तसेच तीव्र आवाजामुळे कानाचे पडदे फाटणे, उच्च रक्तदाबाने गंभीर आजारी पडणे अशा शेकडो वैद्यकीय आपत्कालीन घटना दरवर्षी नोंदवल्या जातात, असे डॉ.चलवादी यांनी नमूद केले. डीजे-डॉल्बीच्या कर्णकर्कश आवाजात गाणी वाजवणे हा आपल्या संस्कृतीचा भाग नाही. सार्वजनिक उत्सवांचा उद्देश समाजात एकोपा, सांस्कृतिक जाणीव आणि सामाजिक बांधिलकी वाढवणे हा आहे. त्यामुळे उत्सव मंडळांनी डीजे-डॉल्बीला प्राधान्य न देता आपल्या समृद्ध परंपरेचा वारसा जपणाऱ्या ढोल-ताशांसह लेझीम, हलगी, तुतारी आणि इतर पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे. पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून उत्सवाचा सांस्कृतिक बाज अधिक प्रभावीपणे जपला जाऊ शकतो आणि पुढील पिढीलाही आपल्या लोकपरंपरांची ओळख करून देता येईल. आधुनिकतेच्या नावाखाली ध्वनीप्रदूषण वाढवण्यापेक्षा संस्कृती, परंपरा आणि सामाजिक सलोखा जपणारा उत्सव साजरा करणे हीच काळाची गरज असल्याचे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले.

## तब्बल ४० फूट एलईडी वॉलद्वारे राधाकृष्ण लीला दर्शन



■ पुणे (दै. संध्या)

सुवर्णयुग तरुण मंडळाचा दहीहंडी उत्सव शनिवारी (दि.५) आयोजित करण्यात आला आहे. तब्बल ४० फूट एलईडी वॉलद्वारे गोपाळभक्तांना राधाकृष्ण लीला दर्शन होणार असून दहीहंडी फोडण्याचा मुख्य कार्यक्रम रात्री ८.३० वाजता होणार असल्याची माहिती मंडळाचे सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांनी दिली. संपूर्ण पुण्याच्या दहीहंडी उत्सवाचे प्रमुख आकर्षक असलेला हा उत्सव बेलबाग चौकाजवळ उत्सवाच्या पारंपरिक जागेत होणार आहे. शनिवारी दुपारी ४ ते ६ यावेळेत नादब्रम्ह ढोल ताशा ध्वज पथक ट्रस्टचे वादक पारंपरिक वाद्यवादन करणार आहेत. त्यानंतर दहीहंडी फोडण्याचा मुख्य कार्यक्रम रात्री ८.३० वाजता होईल. दहीहंडी फोडणाऱ्या संघाला रोख रक्कम ५१,००० व स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. तरी गोपाळभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शॉर्ट सर्किटचा ब्लास्ट... डोळ्यांसमोर अंधार; उपचारांनी पुन्हा दिसू लागले जग!

■ मेटलचे कण डोळ्यात घुसले, चेहराही भाजला; ३५ वर्षीय फोरमॅनला काहीच दिसत नव्हते

■ डॉ. दूधभाते नेत्रालयात तातडीने उपचार; दुसऱ्याच दिवशी ३०-४० टक्के दृष्टी परतली, पुढील उपचारांनंतर ९० टक्क्यांपर्यंत सुधारणा

■ पुणे (दै. संध्या)

कामाच्या ठिकाणी इलेक्ट्रिकचे काम सुरू होते... अचानक शॉर्ट सर्किट झाले आणि क्षणार्धात मोठा ब्लास्ट झाला. या ब्लास्टमधून उडालेले मेटलचे कण थेट डोळ्यात जाऊन घुसले. चेहऱ्यावरही भाजल्याच्या जखमा झाल्या. काही क्षणांपूर्वी व्यवस्थित दिसणाऱ्या ३५ वर्षीय फोरमॅनच्या डोळ्यांसमोर अचानक अंधार पसरला. डोळे उघडणेही शक्य होत नव्हते. मात्र, सहकाऱ्यांनी प्रसंगावधान राखत त्यांना तातडीने पुण्यातील डॉ. दूधभाते नेत्रालय व रेटिना सेंटर येथे आणले. डॉक्टरांनी त्वरित उपचार सुरू केले आणि या गंभीर दुखापतीनंतर रुग्णाच्या दृष्टीत आशादायक सुधारणा होऊ लागली. ही घटना पुण्यातील नामांकित इंजिनीअरिंग कंपनीमध्ये इलेक्ट्रिकचे काम करताना घडली. ३५



वर्षीय रुग्ण फोरमॅन म्हणून काम करतात. काम सुरू असतानाच अचानक शॉर्ट सर्किट होऊन ब्लास्ट झाला. ब्लास्टची तीव्रता एवढी होती की, त्यातून उडालेले मेटलचे कण रुग्णाच्या डोळ्यात गेले. डोळ्यांसोबत चेहऱ्यालाही भाजल्याची दुखापत झाली. अपघातानंतरची परिस्थिती अत्यंत चिंताजनक होती. मेटलचे कण डोळ्यात गेल्यामुळे रुग्णाला काहीच दिसत नव्हते. वेदना आणि दुखापतीमुळे डोळे उघडणेही कठीण झाले होते. अशा परिस्थितीत वेळ न दवडता रुग्णाच्या सहकाऱ्यांनी त्यांना डॉ. दूधभाते नेत्रालयात आणले. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर तज्ज्ञ डॉक्टरांनी तत्काळ रुग्णाची तपासणी केली. डोळ्याची दुखापत गंभीर असल्याचे लक्षात घेऊन प्राथमिक उपचारांना लगेच सुरुवात करण्यात आली. रुग्णाला आयवॉश देण्यात आला आणि आवश्यक डोळ्यांचे ड्रॉप्स सुरू करण्यात आले. उपचारानंतर रुग्णाला पुढील निरीक्षणासाठी ठेवण्यात आले आणि दुसऱ्या दिवशी फॉलोअपसाठी बोलावण्यात आले. उपचारांचा परिणाम दुसऱ्याच दिवशी दिसून आला. अपघातानंतर काहीच दिसत नसलेल्या रुग्णाला दुसऱ्या दिवशी साधारण ३० ते ४० टक्के दृष्टी जाणवू लागली. रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी ही बाब मोठा दिलासा देणारी होती. त्यानंतरच्या उपचारांदरम्यान दृष्टीमध्ये हळूहळू सुधारणा होत गेली. तिसऱ्या आणि चौथ्या दिवसापर्यंत दृष्टीत लक्षणीय फरक जाणवू लागला. पुढील उपचार आणि वैद्यकीय देखरेखीनंतर रुग्णाची दृष्टी जवळपास ९० टक्क्यांपर्यंत सुधारल्याचे रुग्णालयाकडून सांगण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सेवापूर्ती निमित्त प्रल्हाद बारगजे यांचा सन्मान

**चाकण : दैनिक संध्या**

समाजाला दिशा आणि प्रेरणा देण्याचे काम करणारे येथील प्रल्हाद मल्हारी बारगजे यांचा सेवापूर्ती निमित्त चाकण येथे स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे व प्राचार्या प्रमिला गोरे यांच्या हस्ते बारगजे यांना गौरविण्यात आले. यावेळी शिवसेनेचे पुणे जिल्हा प्रमुख भगवान पोखरकर, उपजिल्हा प्रमुख संभाजी शिरसाठ, आदर्श शिक्षक दत्तात्रय लिंभोरे, सिद्धार्थ मळेवडी, सुनिल वडेकर, सुनिल कोटलवार, गणेश काळे, गणेश बेळगे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी खेड तालुक्याचे माजी आमदार स्व. सुरेश भाऊ गोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून बारगजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. चाकण नगर परिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेविका सुवर्णा राक्षे व महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांनी बारगजे यांच्या कार्याचा गौरव केला. अर्जुन बारगजे यांनी स्वागत केले. हरिभाऊ बारगजे यांनी आभार मानले.

### नवदिप तरुण मंडळातर्फे दहीहंडी उत्सवात सामाजिक संस्थांना ३३ हजारांची मदत

**पुणे : दैनिक संध्या**

नवदिप तरुण मंडळ ट्रस्ट, कसबा पेठ यांच्या वतीने गोकुळाष्टमीनिमित्त शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी फडके हौद चौक येथे भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ३ वाजता दहीहंडी उत्सवाला सुरुवात होणार आहे. यावेळी विविध संस्थांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे, अशी माहिती आयोजक अध्यक्ष तुषार शिंदे यांनी केले आहे. वाचन संस्कृती टिकविण्यासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या समाजसेवी संस्थांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मंडळाच्या वतीने शेअर विथ इंडिया फाउंडेशन, कस्तुरी फाउंडेशन आणि वंचित विकास सामाजिक विकास संस्था या तीन संस्थांना प्रत्येकी ११ हजार रुपये रोख मदत देण्यात येणार आहे. दहीहंडी उत्सवानिमित्त कोल्लोळ आणि गंधार या वाद्यपथकांचे वादन होणार आहे.

### वाहतूक कोंडी, पाणीटंचाई व नागरी समस्यांवर तत्काळ उपाययोजना करा

**पिंपरी: दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अपुरा व असमान पाणीपुरवठा, बीआरटी मार्गांची झालेली दुरवस्था, पवना नदीचे प्रदूषण आणि अनधिकृत बांधकामांमुळे रखडलेले रस्ते यांसारख्या विविध गंभीर नागरी समस्यांवर तत्काळ उपाययोजना करण्याचे आदेश मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला दिले. शहरातील विविध प्रश्नांबाबत खासदार बारणे यांनी गुरुवारी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याबरोबर आढावा बैठक घेतली. त्यांनी शहराच्या विविध प्रश्नांचा सविस्तर आढावा घेत तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसेवक निलेश तरस, ऐश्वर्या तरस, राजेंद्र तरस, बापू कातळे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, नगररचना विभागाचे उपसंचालक ललित खोब्रागडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, उपायुक्त अण्णा बोदडे, सहायक आयुक्त मुकेश कोळप यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, शहरातील प्रमुख चौकांमध्ये दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक व वाहनचालक त्रस्त आहेत. अतिक्रमणे, अनधिकृत विक्रेते आणि बेशिस्त पार्किंगमुळे ट्रॅफिक जामची समस्या गंभीर बनली आहे. तासनतास लोकांना एकाच चौकात अडकून राहावे लागते. यासंदर्भात पोलीस आयुक्तांसोबत स्वतंत्र बैठक घेऊन ज्या चौकांत सर्वाधिक कोंडी होते, तिथे तातडीने सूक्ष्म नियोजन करावे. पोलीस व पालिकेने परस्पर समन्वय साधून नागरिकांची या त्रासातून मुक्तता करावी. संध्याकाळच्या वेळी शहरात येणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स बसेससाठी शहराबाहेर वेगळी पार्किंग व्यवस्था करावी, जेणेकरून मुख्य रस्त्यांवर वाहतुकीचा खोळंबा होणार नाही. यासाठी ट्रॅव्हल्स/बस संघटनांसोबत बैठक घेऊन तोडगा काढण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहरात किती सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आणि त्यातील प्रत्यक्ष किती चालू आहेत, याचा ठोस हिशोब प्रशासनाकडे नाही. या कामाची सखोल तपासणी करून तातडीने 'थर्ड पार्टी ऑडिट' करावे. सुरक्षेच्या दृष्टीने शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे २४ तास कार्यरत राहतील याची दक्षता घेण्याचे आदेश बारणे यांनी दिले.

# मानाचा दुसरा श्री तांबडी जोगेश्वरी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे 'ग्रामदेवता पुरस्कार' प्रदान



■ पुणे (दै. संध्या)

पुण्यनगरीतील मानाचा दुसरा गणपती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री तांबडी जोगेश्वरी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे यंदाचा 'ग्रामदेवता पुरस्कार' दिव्यांगांना कृत्रिम हात, पाय व कॅलीपर्स मोफत बसविणाऱ्या नवभारत विकास फाउंडेशन (संलग्न – भारत विकास परिषद) या संस्थेला प्रदान करण्यात आला. तसेच समाजोपयोगी कार्यासाठी बहुमूल्य योगदान देणाऱ्या एकता मित्र मंडळ ट्रस्ट, अरण्येश्वरनगर आणि अभिनव कलाभारती यांना 'सेवाव्रत गौरव' देऊन सन्मानित करण्यात आले. स.प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई सभागृहात पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने आणि उद्योजक पुनीत बालन व श्री कसबा गणपती गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे उपस्थित होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, प्रशांत टिकार, केशव नेऊरगावकर, अभिजीत बर्वे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी तसेच पुण्यातील प्रमुख गणपती मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी गणेश मंडळांकडून सकारात्मक भूमिका घेतली जात आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा ध्वनिप्रदूषण निश्चितच कमी होईल, अशी अपेक्षा आहे. गणेश मंडळांशी संघर्ष करण्याची पोलिसांची कोणतीही भूमिका नाही. उलट, नियमांचे पालन करून उत्साहात गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मंडळांनी सहकार्य करावे. पुणेकर नागरिकांना मी आश्वस्त करतो की, यंदा ध्वनिप्रदूषणाच्या बाबतीत निश्चितच सुधारणा दिसून येईल.

ते पुढे म्हणाले, गणेशोत्सवातील डीजे आणि ध्वनिप्रदूषणाच्या मुद्द्यावर सध्या चर्चा सुरू आहे. याबाबत पोलिसांची भूमिका स्पष्ट असून, डेसिबलच्या निर्धारित मर्यादेचे पालन करणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. गणेशोत्सव हा पुण्याच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येकाला नियमांच्या चौकटीत सण-उत्सव साजरा करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

## पुरस्कार विजेता 'गमन' येणार चित्रपटगृहात

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

नाईकसाटम आर्टस् प्रस्तुत 'गमन' या मराठी चित्रपटाने आपल्या आशयघन संकल्पनेने आणि वास्तववादी सादरीकरणाने आंतरराष्ट्रीय चित्रपट वर्तुळात विशेष ठसा उमटवला आहे. प्रतिष्ठित 'थर्ड आई आशियाई चित्रपट महोत्सवात' या चित्रपटाला 'स्पेशल जुरी मेन्शन - बेस्ट स्टोरी' (विशेष परीक्षकांचा बहुमान) पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच 'संस्कृती कलादर्पण पुरस्कार २०२५' मध्ये अभिनेते नारायण जाधव यांनी 'उत्कृष्ट अभिनेता' हा किताब पटकावला आहे. याशिवाय पुणे, बेंगळुरू, दिल्ली येथील अत्यंत मानाच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये गाजलेला तसेच आता होऊ घातलेल्या जागरण आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आणि शिमला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात या चित्रपटाची अधिकृत निवड झाली आहे समीक्षक व रसिकांकडून चित्रपटाचे भरभरून कौतुक होत आहे.




मनोज नाईकसाटम यांच्या सिद्धहस्त लेखनातून व दिग्दर्शनातून साकारलेला 'गमन' हा चित्रपट वाढत्या शहरीकरणाच्या रेट्यात हरवत चाललेला ग्रामीण जीवनाचा आत्मा आणि पिढ्यांमधील वाढती दरी यावर अत्यंत संवेदनशील भाष्य करतो. कथेचा गाभा कोकणातील एका निसर्गरम्य गावातील 'भाऊ आणि माई' या वृद्ध दांपत्याभोवती फिरतो. वैद्यकीय उपचाराच्या निमित्ताने हे दांपत्य मुंबईतील आपल्या मुलांकडे (प्रताप, मनोहर आणि शरद) वास्तव्यास येते. मुले जरी आई-वडिलांची आस्थेने काळजी घेत असली, तरी आयुष्यभर गावच्या मोकळ्या हवेत, मातीच्या वासात आणि शेती-वाडीत रमलेल्या या वृद्धांचे मन मुंबईच्या धकाधुकीच्या जगात रमत नाही.

दुसऱ्या बाजूला, नैसर्गिक आपत्तीमुळे बेघर झालेली उत्तर भारतातील 'कुंदन आणि तारा' ही बहीण-भावंडे उपजीविकेच्या शोधात मुंबईत दाखल होतात. अथक प्रयत्नांनंतर कुंदनला प्रतापच्या कारखान्यात रोजगाराचा आसरा मिळतो. गणेशोत्सवाच्या निमित्ताने भाऊ-माई आपल्या मूळ गावी निघतात, तेव्हा घराची डागडुजी करण्यासाठी प्रताप कुंदन आणि ताराला त्यांच्यासोबत गावी पाठवतो. तिथे मुलांच्या दुराव्यामुळे भाऊ-माईंच्या आयुष्यात निर्माण झालेली भावनिक पोकळी ही परप्रांतीय भावंडे भरून काढतात आणि त्यांच्यात एक अतुट, अनोखे नाते निर्माण होते. काळ आनंदाने मार्गक्रमण असतो आणि अकस्मात कथानक अशा एका वळणावर येऊन थांबतं जिथे रक्ताची नाती आणि जुळलेली मनाची नाती यावर निर्णय घेणं अपरिहार्य होतं. पुढच्या पिढीची जन्मभूमीशी सुटत चाललेली नाळ आणि ओस पडणारी गावे ही सामाजिक समस्या हा चित्रपट अत्यंत प्रभावीपणे अधोरेखित करतो. उत्कृष्ट तांत्रिक बाजू आणि दर्जेदार अभिनय. चित्रपटाला शैलेश तांबे यांच्या नजरेतून सुरेख छायाचित्रणाची (Cinematography) जोड मिळाली असून, प्रशांत विठ्ठल कांबळे यांचे ध्वनिसंयोजन,पार्श्वसंगीत केले आहे आणि सौरभ नाईक यांचे प्रभावी संकलन चित्रपटाचा प्रभाव अधिक वाढवते. चित्रपटात नारायण जाधव, श्रद्धा खानोलकर, दीपक कुमार आणि हर्षिका मळेकर यांनी अत्यंत नैसर्गिक आणि ताकदीचा अभिनय साकारला आहे. चित्रपट महोत्सवांमध्ये कौतुकाची थाप मिळवणारा हा आशयघन'गमन'चित्रपट दोन ऑक्टोबरपासून सर्वसामान्य प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

### एअरटेलच्या ग्राहकांना १२ महिन्यांचे सुपर सबस्क्रिप्शन

नवी दिल्ली (दै. संध्या) : जगातील आघाडीच्या मोबाइल लर्निंग प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या ड्युओलिंगोने भारती एअरटेलसोबत भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत एअरटेलच्या 37.6 कोटी ग्राहकांना 12 महिने सुपर ड्युओलिंगोची सुविधा कोणतेही अतिरिक्त शुल्क न देता मिळणार आहे. ड्युओलिंगोवर 40 हून अधिक भाषांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. छोटे धडे, गेम्स आणि एआयच्या मदतीने भाषा शिकणे सोपे आणि मनोरंजक बनवले जाते.


**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८**
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी, पुणे - ४४
स्थापत्य विभाग
ई - निविदा नोटीस क्र. ०२/०७/२०२६-२०२७
मुदतवाढ क्रमांक -१

वरील निविदेमधील खालील कामांची स्वीकृती दि. १०/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा पर्यंत वाढविणेत येत आहे. मुळ निविदेतील तपशिलात कोणताही बदल नाही.

| अ.क्र | कामाचा तपशील | निविदा स्वीकृती दिनांक |
|---|---|---|
| १. | अ क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाची निविदा नोटीस क्र.०२/०७/२०२६-२७ मधील काम क्र. ०१, ०४, ०५ व ०७ असे एकुण ०४ कामांमध्ये कोणताही बदल न करता ७ दिवस मुदतवाढ देण्यात येत आहे. | दिनांक १०/०९/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |

सदरची निविदा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तांत्रिक लिफाफा दिनांक २८/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा (शक्य झालेस ) उघडणेत येईल.

जाहिरात क्र. 2026-27/142
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्र. अक्षेका/नि/०४/कावि/१९८/२०२६
दिनांक :- ०४/०८/२०२६

सही/-
(मा. क्षेत्रीय अधिकारी)
अ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे - ४४


### युवा नवोन्मेषक 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो'च्या टॉप-४० मध्ये

मुंबई (दै. संध्या) : महाराष्ट्रातील तीन युवा नवोन्मेषकांनी 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो' या राष्ट्रीय नवोन्मेष उपक्रमाच्या टॉप-४० मध्ये स्थान मिळविले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आर्थिक समावेशन आणि पर्यावरणीय शाश्वतता या क्षेत्रांतील स्थानिक समस्यांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाय शोधण्याचे काम हे युवा नवोन्मेषक करीत आहेत. सॅमसंगच्या या प्रमुख सामाजिक दायित्वाधारित नवोन्मेष उपक्रमाची ही पाचवी आवृत्ती असून, १४ ते २२ वर्षे वयोगटातील तरुणांना वास्तविक जीवनातील समस्या ओळखून त्यावर तंत्रज्ञानाधारित उपाय विकसित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. यंदाच्या स्पर्धेतील 'एआय लिव्हिंग फॉर इंडिया' आणि 'एन्व्हायर्नमेंटल सस्टेनेबिलिटी' या दोन विषयांमध्ये महाराष्ट्रातील युवा नवोन्मेषकांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



### दहीहंडीत पुणेकर अनुभवणार 'दशावतार'

■ पुणे (दै. संध्या)

दहीहंडी हा महाराष्ट्रभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जाणारा उत्सव आहे. या उत्सवाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन आनंदनाथ ट्रस्ट आणि राष्ट्रप्रथम ट्रस्ट यांनी अनोखी दहीहंडी साजरी करायचे ठरवले आहे. 'पुण्याच्या अभिमानाची दहीहंडी, पुण्याची सोन्याची दहीहंडी' या संकल्पनेअंतर्गत हा दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या दहीहंडी महोत्सवाच्या निमित्ताने पुणेकरांना कोकणातील प्रसिद्ध 'दशावतार' नाट्य अनुभवता येणार आहे, अशी माहिती पुणे दहीहंडी उत्सवाचे अध्यक्ष वैभव वाघ व सहकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिली. वैभव वाघ म्हणाले, "दहीहंडीच्या निमित्ताने ४ आणि ५ सप्टेंबर रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. कोकणाची ८०० वर्षांची समृद्ध परंपरा असलेल्या 'संयुक्त दशावतार' हा प्रयोगाने या उत्सवाचा प्रारंभ होणार आहे. शुक्रवारी (ता. ४) रात्री ८.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिरात हा प्रयोग होणार असून, या कार्यक्रमाला गृहराज्यमंत्री योगेश कदम, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित असणार आहेत." शनिवारी (ता. ५) महाराणा प्रताप बागेसमोरील मधुकर चिमणराव पोतनीस रस्ता येथे मुख्य दहीहंडीचा उत्सव साजरा केला जाणार आहे.


JAIHIND COMPREHENSIVE EDUCATIONAL INSTITUTE's
**JAIHIND INSTITUTE OF MANAGEMENT & RESEARCH**
Estd.1996
A/P- Vadgaon Sahani, Taluka - Junnar, District – Pune - 412 401.
Ph. 8793237727,9766000214 E-mail: jaihind.imr@gmail.com

**FACULTY REQUIRED (ADHOC BASIS FOR A.Y. 2026-27)**
Applications are invited for the following posts (MBA, MCA & BCA Programme)

| Programme | Post | No. of Post | Reservation of Post |
|---|---|---|---|
| MBA | Professor | 01 | Open to All |
| | Associate Professor | 02 | 01-SC, 01-OPEN |
| | Assistant Professor | 08 | 01-SC, 01-ST, 01-VJ(A), 01- OBC, 01-SEBC, 01-EWS, 02-OPEN |
| | Librarian | 01 | Open to All |
| MCA | Professor | 01 | Open to All |
| | Associate Professor | 02 | 01-SC,01-OPEN, |
| | Assistant Professor | 08 | 01-SC, 01-ST, 01-VJ(A), 01- OBC, 01-SEBC, 01-EWS, 02-OPEN |
| BCA | Associate Professor | 03 | 01-SC, 01-VJ(A), 01-Open |
| | Assistant Professor | 09 | 01-SC, 01-ST, 01-VJ(A), 01-OBC 01-SEBC, 01-EWS,03-OPEN |

Out of above posts for Assistant Professor for MBA/MCA - 01 post is for reserved for Group A (Blind/Low vision).

Educational Qualification, Experience, Scale of Pay & allowances are as per AICTE/Savitribai Phule Pune University/Govt. of Maharashtra. Eligible & interested Candidates should submit a hard copy of application along attested photocopies of all certificates and complete Bio- Data with passport size photograph **within 15 days** from the date of this advertisement to the Institute address through proper channel by register post or by e-mail.

***TA/DA will not be paid for attending interview.**

**Mr. Jitendra Mahadev Gunjal (Chairman, JCEI)** **Mr. Vijay Mahadev Gunjal (Secretary, JCEI)**



**पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सासवड**
नोंदणी क्रमांक : पीएनए/पीएनआर/बीएनके/ए/४२८ दि. १९/१०/१९८८
मुख्यालय : मार्केटयार्ड, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे, फोन : ( ०२११५ ) २२२५०३
E-mail : pnpssaswad1@gmail.com

**३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना**
**फक्त सभासदांकरिता**

पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सासवड या **संस्थेची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २०/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मा. अध्यक्षा, श्रीमती आनंदीकाकी चंदुकाका जगताप यांचे अध्यक्षतेखाली आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे** येथे आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

विषय क्र. १ : दिनांक २८/०९/२०२५ रोजी झालेल्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
विषय क्र. २ : सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल व दिनांक ३१/०३/२०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाची हिशोबी पत्रके (नफा-तोटा पत्रक व ताळेबंद) स्वीकृत करुन मान्यता देणे.
विषय क्र. ३ : मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२६च्या नफा वाटणी बाबत घेतलेल्या निर्णयाची माहिती घेवून त्यास अंतिम मंजुरी देणे
विषय क्र. ४ : सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
विषय क्र. ५ : सन २०२६-२७ या वर्षाकरीता मा.संचालक मंडळाने तयार केलेले खर्च व उत्पन्नाचे अंदाजपत्रक मंजुर करणे.
विषय क्र. ६ : सन २०२५-२६ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची माहिती घेऊन ती स्वीकारणे व दोष दुरुस्तीस मंजुरी देणे.
विषय क्र. ७ : सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण करणेसाठी मा.सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांनी मंजूर केलेल्या तालिकेवरील लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व लेखा परिक्षण शुल्क ठरविणे आणि आयकर लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
विषय क्र. ८ : मा.संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्ज संदर्भात महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२) नुसार माहिती घेणे.
विषय क्र. ९ : सन २०२५-२६ मध्ये एक रक्कमी परतफेड योजनेत बंद झालेल्या प्रकरणांची माहिती घेणे.
विषय क्र. १० : वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली व ज्या खात्यात वसुलीची शक्यता नाही अशी खाती, वसुलीचे हक्क अबाधित राखून निर्लेखित करणे व नफा तोटा खाती न घेतलेले व्याज उलटविणेबाबत निर्णय घेणे.
विषय क्र. ११ : इमारत झीज निधीची रक्कम इमारत निधीस वर्ग करणेबाबत निर्णय घेणे.
विषय क्र. १२ : नवीन शाखा सुरू करणेबाबत विचार विनिमय करणे.
विषय क्र. १३ : सेवक आकृतीबंध व नेमणुकीस मान्यता देणे.
विषय क्र. १४ : ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
विषय क्र. १५ : मा. अध्यक्षा सो यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार

ठिकाण : सासवड
दिनांक : ०५/०९/२०२६

( श्री.अनिल महादेव उरवणे )
सरव्यवस्थापक

**सुचना :**
१. गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ११.०० वा. घेण्यात येईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
२. सभेपुढील विषयाबाबत काही प्रश्न अथवा सूचना असल्यास शुक्रवार दि. १८/०९/२०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत संस्था कार्यालयात पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.
३. या सुचनेद्वारे संस्थेच्या सभासदांना जाणीव करुन देण्यात येते की त्यांनी त्यांचा सन २०२३-२४ व सन २०२४-२५ चा लाभांश जमा झाल्याची खात्री करावी. तसेच सन २०२२-२३ चा लाभांश जमा झाल्याची खात्री करावी अन्यथा प्रस्तुत लाभांश रक्कम नियमानुसार गंगाजळी खाती वर्ग करण्यात येईल.
४. सभासदांची लाभांशाची (Dividend) रक्कम त्यांच्या सेव्हिंग खात्यात जमा होण्यासाठी सभासदांना व्यवहाराच्या दृष्टीने सोयीस्कर असलेल्या शाखेत आपले सेव्हिंग्ज खाते उघडून संस्थेस सहकार्य करावे.
**५. सभासदांसाठी स्नेह भोजनाची व्यवस्था सभा संपल्यानंतर कार्यक्रम स्थळी ( आचार्य अत्रे भवन सासवड ) करण्यात आली आहे. याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी व स्नेह भोजनाचा आस्वाद घ्यावा.**

## थोडक्यात पण महत्वाचे



### NCMC स्मार्ट कार्ड मोहिमेला प्रतिसाद

**पिंपरी : दैनिक संध्या**

प्रभाग क्रमांक १३ मधील यमुनानगर, सेक्टर २२ आणि साईनाथ नगर परिसरातील नागरिकांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या NCMC (National Common Mobility Card) स्मार्ट कार्ड मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मोहिमेद्वारे तब्बल ८९० नागरिकांनी स्मार्ट कार्डचा लाभ घेतला. मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले आणि माजी नगरसेविका अश्विनी सचिन चिखले-मराठे यांच्या सौजन्याने ही मोहीम साईनाथ नगर येथील मनसे जनसंपर्क कार्यालयात सलग सहा ते सात दिवस राबविण्यात आली. एसटी महामंडळाच्या सहकार्याने ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी अल्पदरात NCMC स्मार्ट कार्ड उपलब्ध करून देण्यात आले. नागरिकांना सुलभ सेवा मिळावी आणि विशेषतः ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय टाळावी या उद्देशाने मोहिमेचे नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे मोठ्या संख्येने नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेतला. मोहिमेला मिळालेल्या प्रतिसादामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, वाढती मागणी लक्षात घेता लवकरच पुन्हा अशी मोहीम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. या उपक्रमाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, नागरिकांना शासनाच्या सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी मनसेच्या वतीने पुढील काळातही अशा जनहिताच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सचिन चिखले यांनी सांगितले.

### पिंपरी-चिंचवडमध्ये दहीहंडी उत्सवात अश्लील नृत्यांवर पोलिसांची करडी नजर

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शहरात दहीहंडी उत्सवाची जोरदार तयारी सुरू असून विविध भागांत भव्य दहीहंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाच्या उत्सवात अनेक नामांकित अभिनेते, अभिनेत्री आणि खेळाडू उपस्थित राहणार असल्याने कार्यक्रमस्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी विशेष खबरदारी घेत संपूर्ण उत्सवावर करडी नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दहीहंडी उत्सवाच्या नावाखाली काही ठिकाणी होणारे अश्लील किंवा आक्षेपार्ह नृत्यप्रकार रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. सेलिब्रिटींच्या उपस्थितीत रंगणाऱ्या कार्यक्रमांमध्ये अनेकदा अशोभनीय प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा घटनांमुळे सामाजिक वातावरण बिघडण्याची तसेच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. यामुळे दहीहंडी उत्सवादरम्यान कोणत्याही मंडळाने अश्लील डान्स, आक्षेपार्ह सादरीकरण किंवा सार्वजनिक शांततेला बाधा आणणारे प्रकार केल्यास संबंधित आयोजकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे. उत्सव हा आनंद, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा असावा, असे सांगत पोलिसांनी सर्व आयोजकांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. तसेच कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास तात्काळ दखल घेऊन संबंधितांविरोधात कायदेशीर पावले उचलली जातील, असेही पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दहीहंडी उत्सव शांततापूर्ण, सुरक्षित आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करणारा व्हावा, यासाठी पोलिसांकडून विशेष बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलीस फौजाही नियुक्त केली जाणार आहे.

### पिंपरी गावात रंगणार दहीहंडीचा थरार..!

**पिंपरी : दैनिक संध्या**

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या उत्साहाला आणखी रंगत आणण्यासाठी पिंपरीगाव येथे शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) सायंकाळी ६ वाजता भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मनोरंजन क्षेत्रातील नामवंत कलाकारांची उपस्थिती आणि राज्यभरातून सहभागी होणाऱ्या गोविंदा पथकांमुळे यंदाचा दहीहंडी उत्सव विशेष आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. आयोजक तथा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक व स्थायी समिती सदस्य संदीप बाळकृष्ण वाघेरे यांच्या पुढाकाराने या भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दहीहंडी उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणून अभिनेत्री राशी खन्ना (फेम – ‘योध्दा’), महिमा मकवाना (फेम – ‘मुसाफिर कॅफे’), नेहा सोनवणे (फेम – ‘रौंदळ’) आणि रुचिता जामदार (फेम – ‘बिग बॉस मराठी सीझन ६’) यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. यंदाच्या दहीहंडी स्पर्धेसाठी आयोजकांकडून तब्बल ७ लाख ७७ हजार ७७७ रुपयांची आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण महाराष्ट्रातील विविध गोविंदा पथकांमध्ये स्पर्धेची उत्सुकता निर्माण झाली आहे. थरावर थर रचत दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये रंगणारा थरार नागरिकांसाठी पर्वणी ठरणार आहे. उत्सवाच्या निमित्ताने पिंपरीगाव परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार असून, विविध सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. गोविंदांच्या मानवी मनोऱ्यांचा थरार, कलाकारांची उपस्थिती, ढोल-ताशांचा गजर आणि उत्साहपूर्ण वातावरण यामुळे दहीहंडी उत्सवाला मोठी रंगत येणार आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या भव्य सोहळ्यास पिंपरी परिसरासह पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक संदीप बाळकृष्ण वाघेरे यांनी केले आहे.

### गोकुळाष्टमीसाठीच्या साहित्याने सजली बाजारपेठ; पोशाखांना मागणी

**पिंपरी : दैनिक संध्या**

श्रीकृष्ण जन्माष्टमी अर्थात गोकुळाष्टमी शुक्रवारी असल्यामुळे शहरातील बाजारपेठा साहित्यांनी सजल्या आहेत. पिंपरी, चिंचवड येथील मुख्य बाजारात कृष्णजन्मासाठी लागणारे लाकडी व मेटलचे पाळणे, बालकृष्णाच्या मूर्ती, बासरी, मुकुट, मोरपंख, वैजयंती माळा आणि आकर्षक पोशाख विक्रीसाठी दाखल झाले आहेत. शहरातील शाळा आणि सोसायट्यांमध्ये गोकुळाष्टमी साजरी केली जाते. त्यामुळे लहान मुलां - मुलींना राधा कृष्णाची वेशभूषा आवर्जून केली जाते. याकरिता बालगोपालांसाठी खास पितांबरी, जरीकाम असलेले अंगरखे, राधा-कृष्णाच्या जोडीसाठी खास ड्रेस बाजारात उपलब्ध आहेत. वेशभूषेबरोबर मुकुट, बासरी आणि मोरपीस यांना मागणी आहे. दरवर्षीप्रमाणे यंदादेखील मथुरा-वृंदावन स्टाईल पोशाख आणि इको-फ्रेंडली मातीच्या मूर्तींना जास्त मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. गोकुळाष्टमीनिमित्त घरोघरी श्रीकृष्ण जन्माचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्याची लगबग सुरू झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील राजकीय पदाधिकाऱ्यांकडून मोठ्या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा लाखोंच्या दहीहंडी फुटणार आहेत. त्याची जय्यत तयारी शहरात सुरू आहे. गर्दी खेचून आणण्यासाठी मोठ-मोठे हिंदी व मराठी सेलिब्रिटींना आमंत्रित करण्यात आले आहे.

# ‘जी ब्लॉक’च्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील छत्रपती संभाजीनगर व शाहूनगर परिसरातील ‘जी ब्लॉक’ हा भूखंड औद्योगिक कर्मचाऱ्यांसाठी निवासी क्षेत्र म्हणून विकसित करण्यात आलेला असून, या परिसरातील जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. यासाठी आमदार अमित गोरखे यांनी सन २०२४ पासून सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.

सन २०२४ च्या हिवाळी अधिवेशनात, दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी नागपूर येथे झालेल्या विधानपरिषद अधिवेशनात आमदार अमित गोरखे महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला होता.

छत्रपती संभाजीनगर व शाहूनगर परिसरातील एमआयडीसीच्या निवासी भूखंडावरील जुन्या इमारतींची अवस्था, रहिवाशांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन या इमारतींच्या पुनर्विकासासाठी ठोस धोरण आखण्याची मागणी त्यांनी केली होती.

या मागणीच्या अनुषंगाने आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) संचालक मंडळाने दि. १५ मे २०२६ रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्र. ७२०४ अन्वये निवासी भूखंडावरील धोकादायक तसेच जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भातील धोरणास मान्यता दिली आहे.

या निर्णयामुळे CDCPR-23 मधील विनियम ६.४ नुसार धोकादायक तसेच ३० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याचा मार्ग खुला झाला आहे. तसेच ३० वर्षांखालील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाच्या वेळी सदनिकांच्या संख्येत वाढ करण्याची आवश्यकता असल्यास, नियमानुसार आकारणी करून पुनर्विकास करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय, माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी



असलेल्या तरतुदीच्या धर्तीवर निवासी भूखंडांच्या पुनर्विकासासाठी सह-विकासक (Co-Developer) नियुक्त करण्यासही एमआयडीसी संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष पुनर्विकास प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. २०२४ पासूनचा सातत्यपूर्ण पाठपुरावा अखेर यशस्वी आमदार अमित गोरखे यांनी याबाबत बोलताना सांगितले की, “छत्रपती संभाजीनगर आणि शाहूनगर परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागणीचा हा विषय होता. जुन्या व धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसोबतच त्यांना चांगल्या व आधुनिक निवासाची सुविधा मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे सन २०२४ च्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न विधानपरिषदेत मांडला. त्यानंतरही शासन आणि एमआयडीसी स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला.


आता एमआयडीसी संचालक मंडळाने पुनर्विकास धोरणाला मान्यता दिल्याने या भागातील नागरिकांच्या अपेक्षांना मोठा दिलासा मिळाला आहे.” ते पुढे म्हणाले, “या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या इमारतींचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे. लवकरात लवकर आवश्यक प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करून पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू व्हावी, यासाठीही आपला पाठपुरावा सुरू राहील.” दरम्यान, महाराष्ट्राचे उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी आमदार अमित गोरखे यांना पाठविलेल्या पत्राद्वारे एमआयडीसी संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाची माहिती दिली असून, धोकादायक व जुन्या निवासी इमारतींच्या पुनर्विकासासाठी मंजूर करण्यात आलेल्या धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यवाही एमआयडीसीमार्फत तातडीने करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे छत्रपती संभाजीनगर, शाहूनगर आणि संबंधित ‘जी ब्लॉक’ परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, २०२४ पासून आमदार अमित गोरखे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर ठोस धोरणात्मक यश मिळाले आहे. या कामासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व सुनेत्राताई पवार यांचे विशेष आभार माननीय अमित गोरखे यांनी मानले आहेत.

# लाकडी, कापडी अन् फोमशिटच्या इकोफ्रेंडली मखरांना पसंती

**पिंपरी(दै. संध्या)**

गणेशोत्सव जवळ आल्याने बाजारात या उत्सवाच्या खरेदीची लगबग सुरू झाली आहे. घरगुती गणपतीच्या सजावटीत मखर हा अविभाज्य भाग असतो. गणेशोत्सव जवळ येताच आकर्षक मखर खरेदीकडे गणेशभक्तांचा कल असतो.

थर्माकोलच्या बंदीमुळे बाजारात इकोफ्रेंडली मखर उपलब्ध झाले आहेत. यामध्ये लाकडी, कापडी, फोमशीट, पुठ्ठ्यापासून बनविलेल्या मखरांना पसंती आहे. बाजारात ठिकठिकाणी वेगवेगळ्या आकारांतील मखरांनी बाजारपेठ फुलू लागली आहे. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करून मखर तयार करण्यावर भर देण्यात आलेला दिसत आहे. स्थानिक विक्रेत्यांनी गणरायाच्या उत्सवासाठी लाकडापासून मखर तयार केले आहे. त्याभोवती कापडाची आकर्षक फुलांची सजावट केली आहे. पातळ लाकड्याच्या पट्ट्या जोडून कापड किंवा नुसती फुलांचीदेखील सजावट केली जाते. तर, काहीवेळा झुरमुळ्या, कुंदन व टिकल्यांचा वापर केला आहे. कापडाला झालर, लेख, टिकल्या, मणी यांचा वापर केलेली दोन ते सहा फुटापर्यंत ही कापडी मखरे उपलब्ध आहेत. ही मखरे घडी करून ठेवता येणाऱ्यासारखी व वॉशेबल आहेत. आकर्षक रंगकाम, स्पार्कल्स, टिकल्या, ॲक्रॅलिक कलर वापरून अतिशय आकर्षक मखरे तयार करण्यात आली आहेत. वजनाला हलकी असल्याने ग्राहकांची पसंती मिळत आहे.




फोमशीटपासून तयार केलेले रेडिमेड व फोल्ड करता येणारे विविध सुंदर प्रकारची मखरे बाजारात उपलब्ध आहेत. विविध मंदिरे, किल्ले, गड यांच्या प्रतिकृती असलेल्या. खडे, आरसे व टिकल्यांनी सजविलेल्या आणि लाईटचा वापर केलेली मखरेदेखील उपलब्ध आहेत.

# खासगी शाळांच्या मनमानी शुल्कवाढीला लगाम

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील खासगी शाळांकडून आकारल्या जाणाऱ्या भरमसाठ शुल्कवाढीच्या विरोधात महापालिकेच्या शिक्षण मंडळाच्या सदस्या तथा नगरसेविका रिटा सचिन सानप यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. खासगी शाळांच्या शुल्कवाढीवर नियंत्रण आणण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर (SOP) मध्ये कडक आणि लोकहिताच्या तरतुदींचा समावेश करण्याची मागणी त्यांनी शिक्षण विभागाकडे केली आहे.

शहरात मोठ्या प्रमाणावर कामगार, मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य कुटुंबे वास्तव्यास असून खासगी शाळांकडून दरवर्षी होणारी अनियंत्रित शुल्कवाढ पालकांसाठी आर्थिक ओझे ठरत आहे. या पार्श्वभूमीवर रिटा सानप यांनी पालकांच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण मागण्या पुढे केल्या आहेत. त्यांनी केलेल्या मागण्यांमध्ये खासगी शाळांच्या शुल्कवाढीवर स्पष्ट नियमांद्वारे नियंत्रण ठेवणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (EWS) विद्यार्थ्यांसाठी किमान २० टक्के जागा राखीव ठेवणे आणि प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी लॉटरी पद्धतीने प्रवेश देणे यांचा समावेश आहे. यामुळे पालकांवरील आर्थिक ताण कमी होण्यासोबतच शिक्षण क्षेत्रात समान संधी उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. यासोबतच विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना जड दप्तरांचे ओझे वाहावे लागत असल्याने त्यांच्या शारीरिक आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे शासनाच्या धोरणानुसार सर्व शाळांमध्ये ‘दप्तर विरहित दिवस’ प्रभावीपणे राबविण्याची मागणी त्यांनी केली आहे. या उपक्रमांतर्गत सुतारकाम, बागकाम, मातीची भांडी तयार करणे, हस्तकला, स्थानिक व्यवसायांची ओळख, कला-क्रीडा उपक्रम, प्रश्नमंजुषा, पुस्तक वाचन, कथाकथन, लोकसंस्कृतीची माहिती, परिसर अभ्यास, क्षेत्रभेटी आणि पर्यावरण संवर्धनाचे प्रत्यक्ष धडे यांचा समावेश करण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला आहे.

# नवीन प्रभागांना अधिकारी, कर्मचारी आणि यंत्रणा द्या

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महापालिकेने नवीन प्रभाग रचना जाहीर केली असली, तरी त्यानुसार अद्याप प्रभागनिहाय अधिकारी, सफाई कामगार, फवारणी कामगार तसेच आवश्यक साधने व उपकरणांचे योग्य नियोजन आणि वाटप झालेले नाही. त्यामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्था आणि कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. नवीन प्रभागांची निर्मिती केवळ कागदावर न राहता त्या प्रभागांना सक्षम मनुष्यबळ आणि आवश्यक यंत्रणा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, अशी मागणी नगरसेवक राहुल कलाटे यांनी केली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या २ सप्टेंबर रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत कचरा आणि स्वच्छता व्यवस्थेच्या प्रश्नावर भूमिका मांडताना राहुल कलाटे यांनी प्रशासनासमोर महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे स्वरूप वेगवेगळे असून त्यानुसार त्याचे संकलन, वर्गीकरण, प्रक्रिया आणि विल्हेवाट यांचे नियोजन होणे आवश्यक आहे. त्यामुळे कचऱ्याच्या प्रश्नाकडे केवळ एखाद्या परिसराचा प्रश्न म्हणून न पाहता संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराचा प्रश्न म्हणून एकात्मिक पद्धतीने उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे कलाटे यांनी स्पष्ट केले. मोशी येथील दुर्दैवी दुर्घटनेनंतर कचरा डेपोच्या जागेवरून सुरू असलेल्या राजकारणावरही राहुल कलाटे यांनी स्पष्ट भूमिका मांडली.

ते म्हणाले, “कचऱ्याच्या प्रश्नावर नागरिकांची दिशाभूल करणारे राजकारण करण्यापेक्षा त्या त्या वेळची परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे.” मोशी येथील कचरा डेपोचे नियोजन ज्या काळात (१९९१ साली) करण्यात आले, त्या वेळी हा परिसर शहराच्या मुख्य नागरी वस्तीजवळ नसलेला आणि तुलनेने विरळ लोकवस्तीचा भाग होता. मात्र, ताथवडे-पुनावळे परिसरात कचऱ्याच्या आरक्षणाचा विचार होत असताना आजची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. आज हा परिसर मोठ्या प्रमाणावर विकसित झालेला आणि घनदाट नागरी वस्तीचा भाग आहे. त्यामुळे पूर्वीचे निर्णय आणि आजची परिस्थिती यांची तुलना करताना वस्तुस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे.

# गणेशोत्सवापूर्वी पिंपरी-चिंचवड खड्डेमुक्त करा

**पिंपरी(दै. संध्या)**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व रस्ते तातडीने खड्डेमुक्त करून आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गणेशोत्सव काळात शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि विसर्जन मार्गांवर भाविक, नागरिक तसेच वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ वाढत असते. मात्र शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या खड्ड्यांमुळे वाहतुकीचा वेग मंदावून कोंडी होण्याची शक्यता असून दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना अपघाताचा धोका वाढला असल्याचे काटे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

गणेशोत्सव हा आनंद आणि भक्तीचा उत्सव असून या काळात रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे कोणत्याही नागरिकाला अपघाताला सामोरे जावे लागू नये, ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे शहरातील सर्व प्रमुख आणि अंतर्गत रस्त्यांची तातडीने



पाहणी करून खड्डे बुजविण्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच गणेश मंडळांच्या मिरवणूक मार्गांवरील रस्ते, विसर्जन मार्ग, प्रमुख चौक आणि गर्दीच्या ठिकाणांची विशेष तपासणी करून आवश्यक ठिकाणी डांबरीकरण व रस्ते दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करावीत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात वाहतुकीला कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, नागरिकांना सुरक्षितपणे प्रवास करता यावा आणि रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघात घडू नयेत यासाठी संबंधित विभागांना स्पष्ट सूचना देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे. “गणेशोत्सव निर्विघ्न, सुरक्षित आणि आनंददायी होणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे हा विषय केवळ नियमित काम म्हणून न पाहता नागरिकांच्या जीविताशी संबंधित महत्त्वाचा विषय म्हणून गांभीर्याने घेऊन गणेशोत्सवापूर्वी शहर खड्डेमुक्त करावे,” असे आवाहनही त्यांनी महापालिका प्रशासनाला केले आहे.

# उच्च न्यायालयात धाव घेण्याच्या भूमिकेनंतर प्रशासन नमले

■ **चिंचवड (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेसह वैधानिक बैठकींचे बंद करण्यात आलेले लाईव्ह प्रक्षेपण पुन्हा सुरू करण्यात आले असून, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने वाघेरे यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेण्याची भूमिका घेतली होती. त्यानंतर प्रशासनाने निर्णयाचा पुनर्विचार करत महासभेचे लाईव्ह प्रक्षेपण पुन्हा सुरू केले. महापालिकेच्या कामकाजात पारदर्शकता राहावी आणि नागरिकांना सभागृहातील चर्चा, निर्णय व लोकप्रतिनिधींची भूमिका थेट पाहता यावी, यासाठी लाईव्ह स्ट्रिमिंगची सुविधा महत्त्वाची मानली जाते. मात्र, १५ जून २०२६ पासून ही सुविधा बंद करण्यात आली होती. त्यामुळे नागरिकांना महापालिकेच्या कामकाजापासून दूर ठेवले जात असल्याची टीका होत होती. लाईव्ह प्रक्षेपण बंद झाल्यानंतर संदीप वाघेरे यांनी महापालिका प्रशासनाकडे लेखी स्वरूपात मागणी नोंदवली होती. महासभा आणि वैधानिक समित्यांच्या बैठकींचे थेट प्रक्षेपण पूर्ववत सुरू करावे, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली होती. तसेच मागणीची दखल न घेतल्यास न्यायालयीन मार्ग स्वीकारण्याचा इशाराही दिला होता. यानंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने वाघेरे यांच्या वतीने कायदेशीर नोटीस बजावण्यात आली. तरीही प्रश्न मार्गी न लागल्याने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी सुरू केली. या पार्श्वभूमीवर प्रशासनावर दबाव निर्माण झाला आणि अखेर लाईव्ह प्रक्षेपण पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. महासभेचे थेट प्रक्षेपण पुन्हा सुरू झाल्याने नागरिकांना आता महापालिकेच्या सभागृहातील कामकाज प्रत्यक्ष पाहता येणार आहे. यामुळे निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होणार असून नागरिकांचा सहभागही अधिक प्रभावी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता वाढवण्यासाठी बैठकींचे व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि प्रसिद्धी करण्याबाबत शासनाने यापूर्वीच निर्देश दिले आहेत. अशा परिस्थितीत लाईव्ह प्रक्षेपण पुन्हा सुरू होणे हा नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे.याबाबत प्रतिक्रिया देताना संदीप वाघेरे म्हणाले, “महापालिका ही नागरिकांची संस्था आहे. सभागृहात कोणते निर्णय घेतले जातात, नागरिकांच्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधी काय भूमिका मांडतात, हे जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. प्रशासनाकडे मागणी करूनही दखल घेतली गेली नाही. त्यामुळे आम्हाला कायदेशीर मार्ग स्वीकारावा लागला. अखेर प्रशासनाला निर्णय बदलून महासभेचे लाईव्ह प्रक्षेपण पुन्हा सुरू करावे लागले. हा विजय कोणत्याही एका व्यक्तीचा नसून पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांच्या पारदर्शकतेच्या अधिकाराचा आहे.” महापालिकेच्या महासभेचे लाईव्ह प्रक्षेपण पुन्हा सुरू झाल्याने शहरात संदीप वाघेरे यांच्या पाठपुराव्याची चर्चा रंगली असून, प्रशासनाच्या पारदर्शक कारभाराच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### श्रावण सहल अजिंक्यतारा किल्ल्यावर बहरली

**पुरंदर : दैनिक संध्या**

सृष्टीतील चराचराला बहर येतो तो श्रावण महिन्यात आणि या बहारामुळेच कवी साहित्यिकांच्या लेखणीतून शब्दांच्या भावनांना नवचैतन्य मिळते. म्हणून साहित्य सम्राट पुणे हि संस्था अनेक वर्षापासून श्रावण महिन्यात निसर्ग सानिध्यात साहित्यिकांच्या गावाला भेट देत असते. श्रावण सहल उपक्रमाद्वारे निसर्ग आणि मराठी भाषेचे सौंदर्य शब्दातून फुलवण्याचे कार्य संस्था करत आहे. आज आपल्या मातृभाषेचे महत्व आपणच घरापासून टिकवण्याची गरज आहे. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांचा अजिंक्यतारा किल्ला तसेच श्री समर्थ रामदास स्वामींचा सज्जनगड अशा आध्यात्मिक आणि ऐतिहासिक प्रेरणादायी स्थळी सहल आयोजित केली आहे. जकातवाडी हे गाव आता कवितांचा गाव म्हणून प्रसिद्ध होत आहे. हे खूप महान आणि महत्त्वाचे कार्य येथील भाषाप्रेमी विचारवंतांनी हाती घेतले आहे. असे मत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. जगातील पहिले कवितांचे गाव येथे माझं कवितांचं गाव आणि साहित्य सम्राट पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने जकातवाडी राजधानी सातारा येथे २२९ वे कवी संमेलन आयोजित केले होते. मंचावर माझं कवितांचं गाव अध्यक्ष प्रल्हाद पारटे, उपाध्यक्ष विश्वास नेरकर, कार्याध्यक्षा सुषमा अलेकरी, जिल्हा अध्यक्ष राजेंद्र पाटील, सचिव प्रज्ञा रोकडे, प्र.पाहुणे शरदचंद्र काकडे, संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ आणि निवेदक जगदीप वनशिव उपस्थित होते. ऐतिहासिक अजिंक्यतारा किल्ल्याचा भक्कमपणा, सौंदर्य आणि शौर्य मनामध्ये साठवून कवीमनाचे साहित्यप्रेमी अध्यात्मिक विचारांच्या आणि थोरसंत समर्थ रामदास स्वामींच्या कर्तृत्वाने पावन झालेले सज्जनगडावर पोहोचले. त्यानंतर तनामनाने फुलून आलेली कवीमने जगातील पहिले कवितांचे गाव, माझं कवितांचं गाव या ठिकाणी मनातील कविता सादर करण्यासाठी प्रचंड उत्साहीत झाले. सुरुवातीला साहित्य सम्राटच्या पुण्याहून आलेल्या सर्व कवी कवयित्री या पाहुण्यांचे स्वागतगीताने स्वागत करण्यात आले. कवितांच्या गावात कवितांचे गाव होण्यासाठी कोणकोणते उपक्रम हाती घेऊन हे कवितांचे गाव साकार झालं याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष विश्वास नेरकर यांनी प्रस्तावनेत दिली.

### डॉ. प्रविण जोशी यांची सहसचिवपदी निवड

**पुरंदर : दैनिक संध्या**



गुळुंचे (ता. पुरंदर ) येथील ग्रामीण लेखक, कवी, संशोधक डॉ. प्रविण जोशी यांची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या सातारा जिल्ह्याच्या सहसचिवपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली. यावेळी तानाजी वाघमोडे यांची कोषाध्यक्षपदी, निलेश कर्वे यांची प्रसिद्धी प्रमुखपदी राजेंद्र निकाळजे यांची संपर्कप्रमुख पदी निवड जाहीर करण्यात आली. सातारा येथे झालेल्या बैठकीत जिल्हाध्यक्ष किरण यादव आणि सरचिटणीस संतोष घोडके यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. डॉ. प्रविण जोशी पाडेगाव (ता. फलटण) येथील प्राथमिक शाळेवर कार्यरत आहेत. त्यांनी आजवर जनसामन्यांच्या अनेक प्रश्नांची सोडवणूक केली असून उपेक्षित, वंचित घटकांसाठी ते काम करतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना समितीने कार्य करण्याची संधी दिल्याचे यावेळी फलटण तालुक्याचे अध्यक्ष संतोष कोळेकर यांनी सांगितले. डॉ. जोशी यांच्या'माणुसकीचा गाव'या पुस्तकाची शासन ग्रंथात नुकतीच निवड करण्यात आली होती. शिक्षकांचे तसेच शाळांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे यावेळी डॉ. जोशी व सहकाऱ्यांनी सांगितले. या निवडीबद्दल जि. प. सदस्य गिरीश बनकर, सरपंच राहुल कोकरे, उपसरपंच प्रियांका खरात, राष्ट्रवादीचे प्रदेश सदस्य कांचन निगडे, केंद्रप्रमुख अजयकुमार शिंदे, मनोज चव्हाण, प्रशांत खताळ, दत्तात्रय जानकर, श्रीकांत दोरगे, अजित हिंगे, संजय निगडे, दिगंबर बामणे आदींनी अभिनंदन केले. तसेच गुळुंचे, निरा, पाडेगाव, गोंदवले, वाघमोडेवाडी येथील अनेक ग्रामस्थांनी शुभेच्छासंदेश देत डॉ. जोशी व सहकार्यांचे अभिनंदन केले.



### जिल्हा परिषदेच्या शाळांना सर्वतोपरी मदत करणार : अर्चनाताई कटके

**पुरंदर : दैनिक संध्या**

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. या विद्यार्थ्यांना शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण अध्यापन करावे. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्या अडचणी सोडवण्यासाठी सदैव कटिबद्ध आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांना सर्वतोपरी मदत करणार असे प्रतिपादन पुरंदर पंचायत समितीच्या सदस्या सौ.अर्चनाताई ज्ञानेश्वर कटके यांनी केले. जि.प. प्राथमिक शाळा पठारवाडी येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न पार पडली. उद्घाटन प्रसंगी सौ. अर्चनाताई कटके बोलत होत्या. केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेला चांबळी केंद्राच्या केंद्रप्रमुख दीपश्री वाणी , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जयश्री चौधरी, उद्योजक शेखर पिसे, मोहन चौधरी, उमेश मांढरे,प्रसाद घाटे , विजय घाटे, विठ्ठलशेठ चौधरी, सुरज घाटे, विशेष शिक्षक दीपक पाटील आदींसह चांबळी केंद्रातील शिक्षकवृंद उपस्थित होते. यावेळी पंचायत समिती सदस्या सौ. अर्चनाताई कटके यांच्याकडून शाळेला वॉटर फिल्टर , उद्योजक शेखर पिसे व मोहन चौधरी यांच्या कडून पाण्याची टाकी , शैक्षणिक साहित्य , सुरज घाटे यांच्याकडून संगणक व उमेश मांढरे यांच्याकडून फळझाडे भेट देण्यात आली अशी माहिती उद्योजक विठ्ठलशेठ चौधरी यांनी दिली. केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेमध्ये जयश्री गजधने व सुवासिनी चव्हाण यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून शैक्षणिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुनील गाडे यांनी केले. आभार सहशिक्षक रोहिदास तांदळे यांनी मानले.

### गुरोळी गावच्या विकास शिल्पकाराला मिळाला बहुमान

**पुरंदर : दैनिक संध्या**

गावच्या विकासाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे माननीय प्रशांत संगिता कैलास खेडेकर (उपजिल्हाधिकारी) यांची महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे संपूर्ण परिसरात आणि सांस्कृतिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे.प्रशांत खेडेकर यांनी गुरोळी गावाचा कायापालट करण्यात आणि गावाला विकासाच्या पथावर नेण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या याच दूरदृष्टीची आणि कामाची दखल घेऊन राज्य शासनाने त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे. महाराष्ट्राचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जपणे, लोककलांना राजाश्रय मिळवून देणे आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांना गती देणे, यामध्ये खेडेकर यांच्या अनुभवाचा मोठा फायदा राज्याला होणार आहे.

# सामाजिक सद्भावासाठी सर्व समाजघटकांनी एकत्र येण्याचे आवाहन

**■ जेजुरी (दै. संध्या)**

दिनांक 3 हिंदू समाजातील विविध जाती-जमातींमध्ये परस्पर संवाद, सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सद्भाव वाढविण्यासाठी सर्व समाजघटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन रा. स्व. संघ, बारामती जिल्हा सहकार्यवाह संतोष गाडे यांनी केले. वाघीरे विद्यालय सासवड येथे नुकतेच सामाजिक सद्भाव बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पुरंदर तालुक्यातील विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत सामाजिक ऐक्य, परस्पर संवाद आणि बंधुभाव अधिक दृढ करण्याबाबत विचारमंथन करण्यात आले.



हिंदू समाजातील विविध जाती-जमातींमधील सामाजिक बांधिलकी जपणे, परस्परांमध्ये संवाद वाढविणे तसेच समाजासमोरील विविध आव्हानांवर सर्व घटकांच्या सहभागातून सामूहिक विचारमंथन करून पुढील दिशा निश्चित करणे, हा या बैठकीचा प्रमुख उद्देश होता.

यावेळी पंचपरिवर्तनाच्या माध्यमातून सामाजिक जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्याच्या दिशेनेही चर्चा करण्यात आली. सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी आचरण आणि नागरिक कर्तव्य या पंचपरिवर्तनातील पाच महत्त्वाच्या विषयांचा अंगीकार करून समाज अधिक सक्षम, संवेदनशील आणि संघटित करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. संतोष तानाजी गाडे यांनी समाजातील सर्व घटकांनी परस्परांतील भेद बाजूला ठेवून सामाजिक एकतेसाठी सकारात्मक भूमिका घेण्याचे आवाहन केले. समाजामध्ये परस्पर विश्वास, संवाद आणि बंधुभाव वाढविण्याबरोबरच सामाजिक समरसतेच्या माध्यमातून प्रत्येक घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. पश्चिम महाराष्ट्र प्रांत शारीरिक टोली सदस्य स्मृती इंगळे यांनी सामाजिक ऐक्य आणि सद्भावाच्या दृष्टीने विविध समाजघटकांनी एकत्रितपणे काम करण्याचे महत्त्व विशद केले. हिंदू समाजाच्या व्यापक हितासाठी विविध घटकांनी आपापल्या स्तरावर नेतृत्व करीत सामूहिक प्रयत्न करण्याची गरज त्यांनी मांडली. बैठकीदरम्यान रक्षाबंधनाचा कार्यक्रमही उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थित विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींनी एकमेकांना रक्षासूत्र बांधून परस्पर बंधुभाव व्यक्त केला. आपण सर्व हिंदू बांधव एक आहोत, एकमेकांच्या सुख-दुःखात सदैव सोबत राहू आणि परस्परांच्या अडचणींमध्ये एकमेकांना आधार देऊ, हा एकात्मतेचा आणि बंधुत्वाचा संदेश या रक्षाबंधनातून देण्यात आला. बैठकीचे आयोजन सामाजिक सद्भाव, पुरंदर तालुका संयोजक स्वप्निल नवनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी पुरंदर तालुक्यातील विविध समाजघटकांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच मान्यवर उपस्थित होते.

## लाडक्या बाप्पांच्या आगमनासाठी पेरणेत मूर्तीवर शेवटचा हात



**■ कोरेगावमुळ (दै. संध्या)**

लाडक्या बाप्पाचे आगमन होण्यासाठी अखेरचे १० ते ११ दिवसांचा कालावधी शिल्लक राहिल्याने मूर्ती कारागिरांकडे मूर्ती तयार करण्याची अंतिम टप्प्यात लगबग सुरु आहे. यामध्ये हवेली तालुक्यातील पेरणे येथे मुर्तीकार बाबा बाळासाहेब कुंभार या कारागिरांच्या पेरणे गावठाण हद्दीतील प्रेम आर्टस् नावे असलेल्या गणेश मूर्ती कारखान्यामध्ये मूर्तीचे काम जवळपास पूर्ण झाले असून मूर्तीवर रंगरंगोटी कामाचा अखेरचा हात फिरविला जात आहे.

बाबा कुंभार यांच्या कारखान्यामध्ये ८ इंचापासून ते ५ फुटापर्यंत मोठ्या प्रमाणात दिमाखदार आकर्षक गणेश मूर्ती घडवून बनविल्या असून त्या होलसेल भावात विक्री केल्या जात आहेत. त्यामुळे येथे हवेली,शिरूर,खेड तालुक्यातील व पुणे शहरातील विविध गावांमधून गणेश भक्त नागरिक अधिक संख्येत येत गणेश मूर्तीची बुकिंग करीत खरेदी करीत आहे. प्लॅस्टर ऑफ पॅरिस मध्ये येथे गणेश मूर्ती घडविण्याचे व तयार करण्याचे काम कारखान्याचे मालक बाबा बाळासाहेब कुंभार यांचा संपूर्ण परिवार करीत आहे.

त्यांच्या परिवारातील आई द्वारका बाळासाहेब कुंभार,पत्नी राणी बाबा कुंभार,मुलगा प्रेम बाबा कुंभार व मुलगी नेहा बाबा कुंभार हे परिश्रम घेत आहे. बाबा कुंभार यांचा होलसेल दरात विक्री करणारा प्रेम आर्ट्स या नावाने कारखाना गेले १५ वर्षापासून सुरू आहे.यावर्षी एकूण आकराशे(११००) मूर्ती तयार केल्या आहेत.

याप्रसंगी या गणेश मूर्ती कारखान्याला भेट देत पाहणी परणेचे ज्येष्ठ नेते सुरेश वाळके, पेरणे-बकोरी सोसायटीचे माजी चेअरमन तथा ज्येष्ठ नेते कौस्तुभ गायकवाड, शिवन्या क्षिरसागर, आदी ग्रामस्थ उपस्थित केली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कारागिरांच्या हाताला काम आणि भक्तांच्या उत्साहाला नवा रंग मिळताना दिसत आहे.

## सिंगापूर येथील नूतन मारुती मंदिराचा कलशारोहण व प्राणप्रतिष्ठा समारंभ

**■ पुरंदर (दै. संध्या)**

विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ व सिंगापूर ग्रामस्थ यांच्या वतीने सिंगापूर (ता.पुरंदर) येथील नूतन मारुती मंदिराचा कलशारोहण व प्राणप्रतिष्ठा समारंभ श्री क्षेत्र नारायणपूर येथील पोपट महाराज टेंबेस्वामी, श्री क्षेत्र नारायणपूरचे व्यवस्थापक,भरतनाना क्षीरसागर व शिवसेना नेत्या ममता शिवतारे- लांडे हस्ते कलश पुजन करून करण्यात आला. सकाळी ७ वा. मंदिर प्रवेश, प्राणप्रतिष्ठा, नवग्रह होम हवन त्यानंतर मूर्तींना अभिषेक दु. १.३० ते २ कलशस्थापना होऊन सनराइज् कंपनीचे राजेंद्र मोरे यांच्या वतीने महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. दु.३ ते ४ होम हवन सायं. ७ ते ९ विठ्ठल आध्यात्मिक शिक्षण संस्था यांच्या वतीने कीर्तनाचा कार्यक्रम होऊन कलशारोहण कार्यक्रमाची सांगता झाली, असल्याची माहिती सरपंच अर्चना लवांडे, उपसरपंच विक्रांत पवार व सिंगापूरकर ग्रामस्थ यांनी दिली. या वेळी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे माजी मानद सचिव सतिश उरसळ, जि.प. सदस्या रुपाली झेंडे, माजी जि. प. सदस्या ज्योती झेंडे, पं.स. उपसभापती प्रविण जगताप, माजी उपसभापती दत्ता काळे,पं.स.सदस्या अर्चना कटके, सरपंच अर्चना लवांडे, उपसरपंच विक्रांत पवार, पुरंदर शिवसेना तालुका प्रमुख उमेश गायकवाड, मा.सरपंच दशरथ लवांडे, माऊली कोरडे, अशोक लवांडे, रामभाऊ उरसळ,मा. उपसरपंच विशाल लवांडे,मा. सरपंच संगीता वारे, मा. उपसरपंच विशाल लवांडे, मा. उपसरपंच सौरभ लवांडे, किर्लोस्कर न्यूमॅटिक कामगार संघ अध्यक्ष संदीप लवांडे,मा. सरपंच सुनंदा गोसावी,प्रविण लवांडे, श्रीहरी लवांडे, काळुराम लवांडे,बाजीराव गोसावी,अक्षय उरसळ, बाळासाहेब कोरडे आदींसह विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळाचे सदस्य, सिंगापूरकर ग्रामस्थ उपस्थित होते.



## महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण

**■ पुरंदर (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील ग्रामपंचायत सिंगापूर व श्री शिवाजी नॉलेज सिटी संस्था शिरूर यांचा संयुक्त विद्यमाने पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणासाठी गावात राहणाऱ्या महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण तसेच प्रशिक्षणानंतर संबंधित महिलांना वाहनचालकाचा शिकाऊ परवाना देण्यासाठी सुरू केलेल्या प्रशिक्षणास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांच्या सबलीकरणसाठी सिंगापूर ग्रामपंचायतीच्या व श्री शिवाजी नॉलेज सिटी संस्था, शिरूर यांच्या वतीने या प्रशिक्षण वर्गाचा अनोखा उपक्रम ३१ ऑगस्टपासून आयोजित केला आहे.

महिलांमध्ये आत्मविश्वास आणि सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यासाठी महिलांना २२ दिवस हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिलांसाठी ते मोफत आहे. हा एक आगळावेगळा व नावीन्यपूर्ण उपक्रम असल्याने गावातील तरुण मुली, नवविवाहिता यांच्यासह अनेक महिलांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. यामध्ये जवळपास ३५ हून अधिक महिलांची प्रशिक्षणासाठी नोंद झाली असून, सकाळी ९ वाजल्यापासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मोटर ड्रायव्हिंगच्या माध्यमातून महिलांना हे प्रशिक्षण दिले जात आहे.

## सार्वजनिक गणेशोत्सवात डिजे, लेसरला बंदी

**■ शिरूर (दै. संध्या)**



आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनिक्षेपकाचा वापर करताना शासनाने निश्चित केलेल्या ध्वनिमर्यादेचे काटेकोर पालन करावे. ध्वनिप्रदूषण करणाऱ्या तसेच डिजे, प्लाझ्मा व लेसरचा वापर करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असा इशारा शिरूर पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी दिला.

शिरूर पोलीस ठाण्यात सार्वजनिक गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांची गणेशोत्सवाच्या नियोजनासंदर्भात बैठक घेण्यात आली.यावेळी पोलीस निरीक्षक विनोद पाटील,नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजित पाचर्णे,उपनगराध्यक्ष मितेश गादिया,मुख्याधिकारी प्रीतम पाटील,कार्यालयीन अधीक्षक राहुल पिसाळ,नगरपरिषद सभापती सुनील जाधव,नगरसेवक सागर नरवडे,निलेश गाडेकर,नगरसेविका सुनीता भुजबळ,महिबुब सय्यद,बापु सानप, शशिकला काळे,डॉ.वैशाली साखरे, सविता बोरुडे यांच्यासह गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक विनोद पाटील म्हणाले,गणेशोत्सव काळात शिरूर पोलीसांची दोन विशेष पथके कार्यरत राहणार आहेत.यातील एक पथक मिरवणुकीच्या मार्गावर गणेश मंडळांची मिरवणूक सुरळीतपणे पुढे जाईल यावर लक्ष ठेवणार आहे.तर दुसरे पथक ध्वनिक्षेपक व ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे पालन होते की नाही,यावर लक्ष ठेवणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून साकारला 'वॉटर मॅनेजमेंट सिस्टीम'प्रकल्प

**■ कवठे येमाई (दै. संध्या)**

शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई येथील न्यू इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांनी 'वॉटर मॅनेजमेंट सिस्टीम' हा अभिनव प्रकल्प साकारत आपल्या कल्पकतेची आणि तंत्रज्ञानातील प्रयोगशीलतेची अनोखी झलक दाखवली आहे.

या प्रकल्पाच्या निर्मितीत कु. वरद थोरात, कु. आशुतोष पोकळे, कु. सोहम गायकवाड आणि कु. देवदत्त सरोदे या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आर्डुइनो,पाणी पातळी संवेदक यांसह विविध तांत्रिक घटकांचा वापर करून पाणी व्यवस्थापन प्रणालीची प्रत्यक्ष कार्यरत अंमलबजावणी केली आहे.

या उपक्रमाबद्दल विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक मुंजावडे एस. डी.तसेच अटल लॅब व एनपॉवर युवा समन्वयक बोंबे एस. आर.यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला आणि नवकल्पनांना प्रोत्साहन दिले आहे.

विद्यालयाचा इयत्ता ९ वी 'अ'चा विद्यार्थी कु. यश उचाले याने या उपक्रमाची सुंदर चित्रफीत तयार केली. त्याबद्दल त्याचे कौतुक करून त्याने सुरू केलेल्या 'यू.सिनेमॅटिक्स' या उपक्रमाला शुभेच्छा देण्यात आल्या. रयत शिक्षण संस्थेची भक्कम शैक्षणिक परंपरा आणि एनपॉवर चे स्टेम (STEM), एआय (AI) व नवोपक्रमात्मक शिक्षणाचे आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुंदर संगम विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मजबूत पायाभरणी ठरत आहे.रयतची शिक्षणाची ताकद + सक्षमीकरण चे आधुनिक तंत्रज्ञान = नव्या पिढीची प्रगती ही विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, प्रयोगशीलतेला आणि नवोन्मेषी विचारांना व्यासपीठ देणारा हा उपक्रम निश्चितच इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.कवठे विद्यालयातील बाल विद्यार्थ्यांनी साकारलेल्या या कल्पक उपक्रमाचे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य प्राचार्य किसनराव रत्नपारखी,सरपंच मनीषा भोर,व ग्रामस्थांनी मनापासुन कौतुक करीत शुभेच्छा दिल्या

## थोडक्यात पण महत्वाचे

### सोनालिकाची ऑगस्टमधील आजवरची सर्वोच्च १२,५८१ ट्रॅक्टर विक्रीची नोंद

**पुणे : दैनिक संध्या**



भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने आर्थिक वर्ष २०२७ मध्ये आपली प्रचंड गती कायम ठेवली असून ऑगस्टमधील आजवरची सर्वोच्च १२,५८१ ट्रॅक्टर विक्रीची ऑगस्ट २६ मध्ये नोंद केली आहे. एकूण उद्योगाच्या कामगिरीच्या तुलनेत ही १.९ पट वाढ असून तिच्यात जगातील सर्वात मोठी ट्रॅक्टर बाजारपेठ असलेल्या भारतीय बाजारपेठेतील आघाडीच्या कंपन्यांमध्ये तिच्या भक्कम स्थितीचे प्रतिबिंब पडले आहे. आपल्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त आणखी एका अविश्वसनीय टप्प्याची भर कंपनीने घातली आहे. कंपनीने जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानी असलेल्या पंजाबमधील होशियारपूर येथील आपल्या ट्रॅक्टर उत्पादन प्रकल्पात १८,०६७ ट्रॅक्टरचे आतापर्यंतचे सर्वाधिक मासिक उत्पादन नोंदवले आहे. आगामी सणासुदीच्या हंगामात शेतकऱ्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी आपली तयारी कंपनीने त्यातून आणखी बळकट केली आहे. या दोन टप्प्यांमधून सोनालिकाच्या एकात्मिक व्यवसाय इकोसिस्टिमची ताकद अधोरेखित झाली आहे ज्यात उत्पादन क्षमता, उत्पादन सामर्थ्य आणि बाजारपेठेची चपळता योग्य समन्वयाने काम करते. सोनालिकाने नवीन गोल्ड सिरीज ट्रॅक्टर्सच्या नेतृत्वाखाली आपल्या दमदार ट्रॅक्टर्सच्या माध्यमातून आपल्या कामकाजात वेग, अचूकता आणि प्रतिसाद वाढविणे सुरू ठेवले आहे. कंपनीच्या वरपासून खालपर्यंत एकात्मिक उत्पादन क्षमतेमुळे तिला गुणवत्तेवर अधिक नियंत्रण साध्य करता येते आणि सानुकूलित तंत्रज्ञानावर चालणारे ट्रॅक्टर तयार करता येतात. त्यामुळे बाजारपेठेतील खास मागण्या तिला पूर्ण करणे शक्य होते. सणासुदीच्या हंगामामुळे शेतकऱ्यांची मागणी आणखी वाढेल अशी अपेक्षा असल्याने, सोनालिका विविध वापर आणि प्रादेशिक आवश्यकतांनुसार शेतीमध्ये समृद्धी आणण्यासाठी सुसज्ज डीलरशिप नेटवर्कसह या महत्त्वपूर्ण मोसमात प्रवेश करत आहे. कंपनीने 'हेवी ड्यूटी दमदार धमाका' ही आपली सर्वात मोठी वार्षिक सणासुदीची ऑफर यापूर्वीच सुरू केली असून तिच्याद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या दमदार फार्म पार्टनर्सना घरी आणण्याची रोमांचक संधी मिळते. या कामगिरीविषयी इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, "ऑगस्ट २६ मध्ये उद्योगाच्या वाढीला १.९ पटीने मागे टाकत ऑगस्टमधील आमची आजवरची सर्वोच्च १२,५८१ ट्रॅक्टरची एकूण विक्री केल्याचा आम्हाला आनंद होत आहे. त्याचबरोबर, आम्ही १८,०६७ ट्रॅक्टरचा आतापर्यंतचा सर्वोच्च मासिक उत्पादनाचा विक्रमही नोंदविला आहे. आमच्या मूल्य साखळीत निर्माण केलेल्या आमच्या अलाईनमेंटची खोली यातून दिसून येते.

### स्क्रीनटाइमपासून ‘सिच्युएशनशिप’पर्यंत... Gen Zच्या वेदनांवर झंडु बामचा ‘अनडू’ मंत्र




**कोलकाता : दैनिक संध्या**

सतत स्क्रीनकडे पाहिल्याने होणारी डोकेदुखी-मानदुखी, डूमस्क्रोलिंगमुळे जाणवणारा थकवा, ओव्हरथिंकिंग, करिअरचा ताण आणि दैनंदिन जीवनातील मानसिक कसरत... आजच्या Gen Zच्या आयुष्यातील या ‘वेदनांना’ नवी भाषा देत झंडु बामने #UndoWithZandu ही नवी कॅम्पेन सुरू केली आहे. ईमामी लिमिटेडच्या परिवारातील झंडु बामने आपल्या पारंपरिक आयुर्वेदिक वारशाला आधुनिक लोकप्रिय संस्कृतीशी जोडत १६ ते २८ वयोगटातील तरुण ग्राहकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला आहे. ‘Gen Zला उपदेश न करता, त्यांच्याच भाषेत त्यांच्याशी संवाद साधा’ या विचारावर ही मोहीम आधारित आहे. या कॅम्पेनमध्ये ‘पेनलँड’ नावाची काल्पनिक दुनिया साकारण्यात आली आहे. या जगात तरुणांना आधुनिक जीवनातील विविध प्रकारच्या त्रासांचा सामना करताना दाखवण्यात आले आहे. अशा वेळी एक उत्साही व्यक्तिमत्त्व त्यांच्या समस्यांवर तोडगा सुचवते आणि ‘वेदनेला करा अनडू विथ झंडु’ हा संदेश दिला जातो. झंडु बाम अनेक दशकांपासून डोकेदुखी, अंगदुखी आणि सर्दीमुळे होणाऱ्या त्रासासाठी भारतीय कुटुंबांमध्ये परिचित आहे. मात्र, आजच्या तरुण पिढीच्या जीवनशैलीत ‘वेदना’ या संकल्पनेचे स्वरूप बदलले आहे. त्यामुळे या मोहिमेत शारीरिक त्रासांसोबतच करिअरचा ताण, बर्नआउट, ओव्हरथिंकिंग, नात्यांमधील गुंतागुंत आणि सोमवारच्या कामाची चिंता अशा आधुनिक जीवनातील प्रसंगांचाही विनोदी आणि मनोरंजक पद्धतीने समावेश करण्यात आला आहे. ईमामी लिमिटेडचे संचालक मोहन गोयनका म्हणाले, “लोकप्रिय संस्कृतीमध्ये झंडु बामने आपले स्थान निर्माण केले आहे. ‘मुन्नी बदनाम हुई’ सारख्या लोकप्रिय गाण्याचा वापर असलेली जाहिरातही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. त्या वारशाला पुढे नेत #UndoWithZanduच्या माध्यमातून आजच्या डिजिटल पिढीच्या दैनंदिन वेदना आणि त्रासांना नव्या पद्धतीने संबोधित करण्याचा प्रयत्न केला आहे.”

### स्कॅपिया-ॲक्सिस बँकेकडून नव्या पिढीच्या प्रवाशांसाठी क्रेडिट कार्ड

■ दैनंदिन खर्चावर १० टक्क्यांपर्यंत रिवॉर्ड्स; ट्रॅव्हल बुकिंगवर २० टक्क्यांपर्यंत स्कॅपिया कॉइन्स

**पुणे : दैनिक संध्या**

भारतातील ट्रॅव्हल फिनटेक कंपनी स्कॅपिया आणि खासगी क्षेत्रातील आघाडीची बँक ॲक्सिस बँकेने ‘स्कॅपिया ॲक्सिस बँक क्रेडिट कार्ड’ सादर केले आहे. नव्या पिढीतील भारतीय प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या कार्डच्या माध्यमातून पेमेंट्स, रिवॉर्ड्स आणि ट्रॅव्हल बुकिंगचा डिजिटल अनुभव एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. या कार्डसाठी ऑनबोर्डिंग प्रक्रिया ३ सप्टेंबरपासून सुरू झाली आहे. स्कॅपिया ॲपच्या माध्यमातून ग्राहकांना खर्चाचे व्यवस्थापन व ट्रॅकिंग करण्यासोबतच फ्लाइट्स, हॉटेल्स आणि विविध प्रवासाशी संबंधित सेवांचे बुकिंग करता येणार आहे. पात्र दैनंदिन खर्चावर १० टक्क्यांपर्यंत रिवॉर्ड्स, तर स्कॅपिया ॲपवरील पात्र ट्रॅव्हल बुकिंगवर २० टक्क्यांपर्यंत स्कॅपिया कॉइन्स मिळणार आहेत. हे कॉइन्स फ्लाइट्स, हॉटेल स्टे, व्हिसा, विविध अनुभव आणि अन्य प्रवासाशी संबंधित सेवांसाठी रिडीम करता येतील. हे कार्ड मास्टरकार्ड आणि रुपे या दोन्ही नेटवर्कवर उपलब्ध आहे. दैनंदिन खर्चापासून प्रवासाचे नियोजन आणि बुकिंगपर्यंतचा डिजिटल अनुभव अधिक सुलभ करण्याचा या कार्डचा उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी शून्य फॉरेक्स मार्कअप आणि स्मार्ट फॉरेक्स सुविधा देण्यात आली आहे. यामुळे परदेशातील व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता आणि नियंत्रण मिळण्याचा दावा करण्यात आला आहे. कार्डधारकांना विमानतळावरील लाउंज, डायनिंग आणि प्रीमियम रिटेल यांसारख्या सुविधांचाही लाभ घेता येणार आहे. याशिवाय, स्कॅपिया ॲपद्वारे पूर्णपणे डिजिटल ऑनबोर्डिंग आणि कार्ड व्यवस्थापनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्कॅपियाचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल गोटेटी म्हणाले, “तरुण भारतीय पूर्वीपेक्षा अधिक प्रवास करत आहेत. त्यांच्या वाढत्या आकांक्षांना अनुरूप आर्थिक उत्पादन देण्याच्या उद्देशाने स्कॅपियाची निर्मिती करण्यात आली आहे. एकाच ॲपच्या माध्यमातून खर्च, प्रवासाचे बुकिंग, प्रवासासाठी आवश्यक खरेदी आणि रिवॉर्ड्स यांचा अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आमच्या वापरकर्त्यांनी स्कॅपियाचा वापर आधीच १७५हून अधिक देशांमध्ये केला आहे. ॲक्सिस बँकेसोबतच्या भागीदारीमुळे ही सुविधा देशभरातील अधिकाधिक भारतीयांपर्यंत पोहोचवता येणार आहे.” ॲक्सिस बँकेच्या कार्ड्स, पेमेंट्स आणि वेल्थ मॅनेजमेंट विभागाच्या ग्रुप हेड अर्निका दीक्षित म्हणाल्या, “स्कॅपियासोबतची भागीदारी ही डिजिटल-फर्स्ट आणि आधुनिक ग्राहकांच्या प्रवासाच्या अनुभवाशी सुसंगत उत्पादने तयार करण्याच्या आमच्या उद्दिष्टाचे प्रतीक आहे.

# मासिक पाळीविषयी मुलांच्या दृष्टिकोनात बदल झाल्याचे उघड

*मासिक पाळीबद्दल चर्चा करताना मुलांमध्ये त्यांच्यात अधिक सहजता दिसून येते, मुलांनी ती समजून घेतली पाहिजे याची अधिक प्रबळ जाणीव होते आणि त्यांच्यात समवयस्क मुलींना पाठिंबा देण्याचा आत्मविश्वास वाढतो, असे महाराष्ट्रातील २,४०२ मुलांच्या एका पाहणीतून आढळले आहे. त्याचबरोबर बदलती मानसिकता आणि दैनंदिन वर्तन यांमधील दरीवरही यातून प्रकाश पडतो.*




■ **पुणे (दै. संध्या)**

मासिक पाळीच्या काळात एखाद्या मुलीच्या कपड्यांवर डाग पडतात. अशा क्षणी, एखाद्या विनोदामुळे तिची लाज अधिकच वाढू शकते, तर एखाद्या सहानुभूतीपूर्ण प्रतिसादामुळे तिला आधार मिळाल्यासारखे वाटू शकते. मासिक पाळी हा तिच्यासाठी लज्जेचा विषय ठरतो की ती सन्मानाने तिचा सामना करू शकते, हे तिच्या आजूबाजूचे लोक कशी प्रतिक्रिया देतात यावरूनच ठरते.

मासिक पाळीच्या आरोग्यासंदर्भातील प्रयत्न हे अनेक वर्षांपासून प्रामुख्याने मुलींना मासिक पाळीची उत्पादने, माहिती आणि स्वच्छता मिळवून देण्यावर केंद्रित राहिले आहेत. परंतु कलंकमुक्त अनुभव निर्माण करण्यासाठी त्यांच्या सभोवतालचे वातावरण बदलणे देखील आवश्यक असते. यामध्ये त्यांच्यासोबत असलेले वर्गमित्र, मित्र, भाऊ आणि कालांतराने जोडीदार व सहकारी म्हणून वाढणाऱ्या मुलांच्या वृत्ती व वर्तनाचाही समावेश आहे.

अद्वैतेशा बिर्ला यांनी स्थापन केलेल्या आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा एक उपक्रम असलेला ‘उजास’ मुलांना या संवादात सामील करून घेण्यासाठी कार्यरत आहे. महाराष्ट्रातील २,४०२ मुलांमध्ये केलेल्या परिणाम मूल्यमापनातून हे दिसून आले आहे की, मासिक पाळीबद्दलची त्यांची समज आणि त्याविषयीच्या त्यांच्या दृष्टिकोनात लक्षणीय बदल झाले आहेत. या उपक्रमानंतर पौगंडावस्थेबद्दलची समज ८३.६% ने वाढली, मासिक पाळीबद्दल चर्चा करण्याचा आत्मविश्वास ५९.८% ने वाढला आणि आपल्या समवयस्क मुलींना पाठिंबा देण्याचा आत्मविश्वास ५१.७% ने वाढला. मासिक पाळीबद्दल आपल्याला माहिती असायला हवी, असे मानणाऱ्या मुलांचे प्रमाण ५०% वरून ७२% पर्यंत वाढले. मासिक पाळीचे आरोग्य हा केवळ मुलींचा प्रश्न नसून ती एक सामायिक जबाबदारी आहे, ही जाणीव वाढत आहे हे यातून दिसून येते. त्याच वेळी, बदलणारे दृष्टिकोन आणि दैनंदिन वर्तन यांच्यातील एक महत्त्वाची तफावत या निष्कर्षांमधून समोर आली आहे. महिला वर्गमित्रांना पाठिंबा देण्याचा आत्मविश्वास ५४% वरून ८२% पर्यंत वाढला असला तरी, जेव्हा एखाद्या वर्गमैत्रिणीच्या कपड्यांवर डाग पडले तेव्हा योग्य प्रतिसाद दर्शविणाऱ्या मुलांचे प्रमाण ४३% वरून ४०% पर्यंत घसरले आहे.

‘उजास’च्या दृष्टीने ही तफावत लक्षणीय आहे. यातून हे दिसून येते की, मुलांना काय माहीत आहे आणि ते कशावर विश्वास ठेवतात हे बदलणे ही केवळ पहिली पायरी आहे; एखादी मुलगी जेव्हा अडचणीच्या परिस्थितीत असते तेव्हा ही समज वर्तनात कशी उतरते, ही खरी कसोटी पाहणारी गोष्ट असते. त्यामुळे, जागरूकता आणि सदिच्छेच्या पलीकडे जात सहानुभूती, संवेदनशीलता आणि योग्य प्रतिसाद देण्याचा आत्मविश्वास विकसित करणे ही पुढची पायरी असते.

या निष्कर्षांविषयी बोलताना आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा उपक्रम असलेल्या “उजास’ ’च्या प्रमुख पूनम पाटकर म्हणाल्या: मासिक पाळीच्या आरोग्याची समस्या केवळ मुलींना पॅड्स देऊन सुटू शकत नाही. मुलींनी कोणतीही लज्जा न बाळगता मासिक पाळीच्या अनुभवातून जावे असे आपल्याला वाटत असेल, तर त्यांच्यासोबत वाढणाऱ्या मुलांची मानसिकताही आपल्याला बदलावी लागेल. मुलांना जेव्हा या संवादात सामील केले जाते, तेव्हा त्यांच्यामध्ये सहजता, वृत्ती आणि आपल्या समवयस्कांना पाठिंबा देण्याच्या आत्मविश्वासात स्पष्ट बदल दिसून येतो, असा आमचा अनुभव आहे. पण जागरूकता ही केवळ सुरुवात आहे. आपण मुलींना मासिक पाळीबद्दलचा प्रवाद दूर करायला सांगून मुलांना या संवादातून बाहेर ठेवू शकत नाही. जर आपल्याला मुलींच्या पुढच्या पिढीचा अनुभव बदलायचा असेल, तर आपल्याला मुलांच्या पुढच्या पिढीची समजही बदलावी लागेल. मासिक पाळीची प्रतिष्ठा ही मुली स्वतःसाठी निर्माण करू शकतील, अशी गोष्ट नाही. ती आपण त्यांच्या सभोवताली निर्माण केलेल्या वातावरणातून निर्माण होते.

## AI फीचर्स सह विवोचा नवा T5 स्मार्टफोन लाँच

■ **मुंबई (दै. संध्या)**

विवो इंडियाने आपल्या परफॉर्मन्स-केंद्रित T-सिरीजमध्ये विवो T5 हा नवा स्मार्टफोन दाखल केला आहे. तरुण आणि तंत्रज्ञानप्रेमी ग्राहकांना लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये दमदार प्रोसेसर, मोठी बॅटरी, प्रीमियम डिस्प्ले, AI क्षमता आणि मल्टी-कॅमेरा सेटअप देण्यात आला आहे. विवो T5ची सुरुवातीची किंमत ₹३४,९९९ आहे. विवो T5मध्ये MediaTek Dimensity 7500 Turbo प्रोसेसरसह AI-रेडी NPU इंजिन देण्यात आले आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, या तंत्रज्ञानामुळे 3B LLM मॉडेलवरील ऑन-डिव्हाइस AI जनरेशनमध्ये २३३ टक्क्यांपर्यंत वेग मिळतो. ४nm प्रक्रियेवर आधारित या चिपसेटमध्ये ऑक्टा-कोर CPU, Kraken GPU आर्किटेक्चर आणि आठव्या पिढीचे NPU देण्यात आले आहे. ७०५० mAh




बॅटरी आणि १४४Hz कर्व्ड AMOLED डिस्प्ले फोनमध्ये ७०५०mAh क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली आहे. त्यासोबत १७.३५ सेंमी म्हणजेच ६.८३ इंचाचा 1.5K 144Hz 3D कर्व्ड AMOLED डिस्प्ले मिळतो. मोठी बॅटरी आणि प्रगत डिस्प्ले असूनही स्मार्टफोन स्लिम आणि हलक्या वजनाच्या फॉर्म फॅक्टरमध्ये तयार करण्यात आल्याचा कंपनीचा दावा आहे. विवो इंडियाच्या ऑनलाइन विभागाचे मुख्य व्यवसाय अधिकारी पंकज गांधी म्हणाले, “T-सिरीज दमदार कामगिरी आणि विश्वासार्ह टिकाऊपणासाठी ओळखली जाते. विवो T5च्या माध्यमातून आम्ही दमदार परफॉर्मन्स आणि प्रीमियम डिझाइन यांचा समतोल साधला आहे. उत्कृष्ट कामगिरीसोबतच प्रीमियम डिझाइन, इमेजिंग आणि स्मार्ट AI अनुभवावरही आम्ही भर दिला आहे.” ५०MP OIS कॅमेरा आणि 4K व्हिडिओ फोटोग्राफीसाठी विवो T5मध्ये Sony IMX882 सेन्सरसह ५०MP OIS मुख्य कॅमेरा देण्यात आला आहे. यासोबत ८MP अल्ट्रा-वाइड कॅमेरा आणि ३२MP फ्रंट कॅमेरा आहे. फ्रंट आणि रिअर दोन्ही कॅमेऱ्यांद्वारे 4K व्हिडिओ रेकॉर्डिंग करता येणार आहे.

दैनंदिन कामे अधिक जलद आणि सोपी करण्यासाठी फोनमध्ये विविध AI-आधारित फीचर्स देण्यात आले आहेत. काम, कंटेंट निर्मिती, मनोरंजन, फोटोग्राफी आणि दैनंदिन वापर या विविध गरजा लक्षात घेऊन स्मार्टफोनची रचना करण्यात आली आहे.

## भारतातील फायदेशीर आणि इंटेलिजंट ट्रकिंगसाठी नवीन मानक प्रस्थापित

■ **पुणे (दै. संध्या)**

महिंद्रा ट्रक अँड बस या महिंद्रा ग्रुपचा भाग असलेल्या कंपनीने आज नवीन ब्लेजो आय-टीआरके लाँच करण्याची घोषणा केली. हा नेक्स्ट-जनरेशन हेवी कमर्शियल ट्रक ट्रान्सपोर्टर्स आणि फ्लीट मालकांसाठी एकाच मुख्य आश्वासनासह डिझाइन केला आहे - प्रॉफिट का रॉकेट.

केवळ एक ट्रक नसून एक पूर्ण व्यावसायिक सोल्यूशन म्हणून विशेषतः डिझाइन केलेला ब्लेजो आय-टीआरके श्रेणीतील सर्वोत्तम इंधन कार्यक्षमता, उच्च-कामगिरी पॉवरट्रेन, बुद्धिमत्तापूर्ण कनेक्टेड तंत्रज्ञान आणि उद्योगातील आघाडीची अपटाईम गॅरंटी यांना एकत्र आणतो. हे ग्राहकांना कमाई जास्तीत-जास्त वाढवण्यास, उत्पादकता सुधारण्यास, ऑपरेटिंग खर्च कमी करण्यास आणि त्यांच्या फ्लीटवर अधिक नियंत्रण ठेवण्यास सक्षम करते. ब्लेजो आय-टीआरके ग्राहकांच्या तीन महत्त्वाच्या आश्वासनांवर आधारित डिझाइन करण्यात आला आहे: १० टक्क्यांपर्यंत उत्तम इंधन कार्यक्षमता प्रदान करणारा ब्लेजो आय-टीआरकेमध्ये इंधनाच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत-जास्त फायदा मिळवण्यासाठी एआय-सक्षम आयफ्यूअलस्मार्ट ऑटो ड्राईव्ह मोड, टर्बोमॅक्स टर्बोचार्जर, ऑप्टिफ्यूअल एअर कॉम्प्रेसर आणि इतर अनेक हार्डवेअर सोल्यूशन्स व सॉफ्टवेअर नाविन्यतांसह प्रगत तंत्रज्ञानाचा समावेश आहे. ही एकत्रित बचत पाच वर्षांत प्रति ट्रक १५ लाख रूपयांपर्यंतच्या अतिरिक्त नफ्यात रूपांतरित होऊ शकते, ज्यामुळे ग्राहकांना त्यांचा व्यवसाय वेगाने वाढवण्यास मदत होते.



## बालचमूंनी जल्लोष करत फोडली पुस्तकांची हंडी

■ **पुणे (दै. संध्या)**

राधा कृष्ण वेशभूषेतील नु . म. वि. शिशु शाळेतील बालचमूंच्या हस्ते जल्लोष करत "दहीहंडी उत्सव" निमित्त आयोजित "पुस्तकांची हंडी" फोडण्याचा आनंद घेतला. दहीहंडीच्या अनेक गाण्यांच्या तालावर पुस्तक हंडी भोवती नाचण्याचा आनंद घेतला. "हाथी घोडा पालखी .... जय कनैया लाल की" च्या घोषणा पुस्तक हंडी फोडताना उपस्थित सर्व मुलांनी शिक्षकांच्या द्वारे देण्यात आली.

नु . म. वि. शिशु शाळा व साईनाथ मंडळ ट्रस्ट तर्फे पुस्तक हंडी चे आयोजन करण्यात आले.

## नवोन्मेष प्रवेगक कार्यक्रम $MC^2$+ IGNITE चे सह-आयोजन

■ **पुणे (दै. संध्या)**

इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (इंडियनऑइल), व्हेंचर सेंटर आणि सीएसआयआर –नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (सीएसआयआर-एनसीएल) यांच्या संयुक्त विद्यमाने आज एनसीएल मुख्य सभागृहात $MC^2$+ IGNITE — भारतातील प्रमुख ऊर्जा नवोन्मेष प्रवेगक कार्यक्रमाच्या पुणे आउटरीचचे सह-आयोजन करण्यात आले. “Advancing Energy Innovations” या शीर्षकाखाली आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम $MC^2$ Foundation च्या मार्गदर्शनाखाली तसेच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या मार्गदर्शनाने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात देशातील प्रमुख ऊर्जा कंपन्या, संशोधन संस्था, डीप-टेक स्टार्ट-अप्सचे संस्थापक आणि वैज्ञानिक समुदाय एकत्र आले.




कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते पद्मविभूषण डॉ. आर. ए. माशेलकर, एफआरएस यांनी या उपक्रमाला “योग्य वेळी सुरू झालेला आणि खऱ्या अर्थाने परिवर्तनकारी” उपक्रम असे संबोधले. आइन्स्टाईन यांच्या समीकरणाचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, देशातील ऊर्जा क्षेत्रातील प्रमुख कंपन्या भारतातील नवोन्मेषकांच्या पाठबळासाठी प्रयोगशाळा, सुविधा, मार्गदर्शन, भांडवल आणि बाजारपेठेतील प्रवेश या सर्व बाबी एकत्र आणत आहेत. त्यांनी संस्थापकांना संपूर्ण आणि सर्वसमावेशक उपाय विकसित करण्याचे आवाहन केले ज्यामुळे भारताचा प्रवास “Make in India” पासून “Innovate in India” आणि अखेरीस “Own in India” पर्यंत होऊ शकेल.

या कार्यक्रमाला संबोधित करताना श्री ए. एस. साहनी, अध्यक्ष, इंडियनऑइल, म्हणाले: “येत्या काही वर्षांत जागतिक ऊर्जा मागणीत मोठी वाढ होणार आहे आणि भारताची वाढ कदाचित जगाच्या वाढीपेक्षाही अधिक वेगाने होऊ शकते. मात्र, आतापर्यंत भारतातील स्टार्ट-अप भांडवलाचा केवळ एक छोटासा हिस्सा ऊर्जा क्षेत्रात पोहोचला आहे. $MC^2$+ IGNITE च्या माध्यमातून आम्ही इंडियनऑइल ची पायाभूत सुविधा संस्थापकांसाठी खुली करत आहोत.

# पालकत्व, विश्वास आणि नात्यांची गुंतागुंत उलगडणारा ‘अडकित्ता’

## सई ताम्हणकर, सिद्धार्थ चांदेकर, सखी गोखले प्रमुख भूमिकेत; ११ सप्टेंबरला झी5वर प्रीमियर

■ **मुंबई (दै. संध्या)**

पालकत्व, विश्वास आणि जिव्हाळ्याच्या नात्यांमधील गुंतागुंत उलगडणारा ‘अडकित्ता’ हा नवा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आशुतोष परांडकर दिग्दर्शित या चित्रपटाचा प्रीमियर ११ सप्टेंबर २०२६ रोजी केवळ झी5वर होणार आहे. सई ताम्हणकर, सिद्धार्थ चांदेकर आणि सखी गोखले यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट कुटुंब, करिअर, पालकत्व आणि नात्यांतील विश्वास यांचा भावनिक वेध घेणार आहे. मंगेश पवार अँड कंपनी आणि जॅकपॉट एंटरटेनमेंट निर्मित ‘अडकित्ता’ मध्ये आजच्या शहरी जीवनातील वास्तव आणि पालकत्वासमोरील आव्हाने प्रभावीपणे मांडण्यात आली आहेत. करिअर आणि कुटुंब यांचा समतोल साधताना तरुण जोडप्याला करावी लागणारी धडपड, त्यातून निर्माण होणारे ताणतणाव आणि दुसऱ्यावर वाढत जाणारे अवलंबित्व या सगळ्याचा प्रवास चित्रपटात पाहायला मिळणार आहे. गौतम आणि कस्तुरी हे स्वतंत्र विचारांचे




आणि करिअरला प्राधान्य देणारे जोडपे. मूळ गावापासून दूर त्यांनी स्वतःचे सुखी आयुष्य उभे केले आहे. मात्र मूल होण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण मिळते. कठीण गर्भावस्थेनंतर त्यांचा मुलगा ओंकारचा मुदतपूर्व जन्म होतो. त्यानंतर नव्या पालकत्वाची जबाबदारी आणि व्यावसायिक आयुष्य यांचा समतोल साधताना दोघांची मोठी कसरत सुरू होते.

ओंकारची काळजी घेण्यासाठी ते मंगल नावाच्या नॅनीची मदत घेतात. सुरुवातीला मंगल त्यांच्यासाठी मोठा आधार ठरते. मात्र हळूहळू गौतम आणि कस्तुरी तिच्यावर अधिकाधिक अवलंबून राहू लागतात. त्याचबरोबर त्यांच्या घरातील दैनंदिन व्यवहार, निर्णय आणि सवयींवरही मंगलचा प्रभाव वाढत जातो. मदत म्हणून घरात आलेली व्यक्ती कधी त्यांच्या आयुष्यावर नियंत्रण ठेवू लागते, हे त्यांनाही कळत नाही.

यामुळे साधी वाटणारी पालकत्वाची कथा पुढे विश्वास, परावलंबित्व, कुटुंबातील नात्यांच्या मर्यादा आणि भावनिक संघर्ष यांचा उत्कंठावर्धक प्रवास बनते. मंगलची भूमिका साकारणारी सई ताम्हणकर हिने आपल्या भूमिकेबद्दल सांगितले की, मंगलच्या व्यक्तिमत्त्वात वरवर दिसते त्यापेक्षा बरेच काही दडलेले आहे. प्रेमाच्या समान धाग्यामुळे वेगवेगळ्या विचारांची आणि स्वभावाची माणसे एकाच भूमिकेवर कशी येतात, हे चित्रपटात सुंदरपणे मांडले आहे. भावनिकता, तणाव आणि जिव्हाळा यांचा सुरेख मिलाफ या चित्रपटात असल्याचे तिने नमूद केले. गौतमच्या भूमिकेतील सिद्धार्थ चांदेकरच्या व्यक्तिरेखेलाही पालकत्वानंतर बदलणाऱ्या आयुष्याचा सामना करावा लागतो. कुटुंबाला वेळ देतानाच करिअर घडविण्याची धडपड करणाऱ्या गौतमचा गोंधळ आणि संघर्ष प्रेक्षकांना परिचित वाटेल. विनोद आणि जिव्हाळ्याच्या माध्यमातून या परिस्थिती मांडतानाच व्यक्तिरेखांचा भावनिक प्रवासही चित्रपटात उलगडतो. कस्तुरीची भूमिका साकारणारी सखी गोखले म्हणते की, शहरात राहणाऱ्या स्वतंत्र विचारांच्या महिलेसमोर मातृत्व आणि महत्त्वाकांक्षा यांचा समतोल साधण्याचे आव्हान असते. हा संघर्ष अनेकांच्या आयुष्यात असला तरी त्यावर फारसे बोलले जात नाही. त्यामुळे कस्तुरीची व्यक्तिरेखा आणि ‘अडकित्ता’ची कथा अनेकांना स्वतःच्या आयुष्याचे प्रतिबिंब वाटू शकते.

### भावना, विनोद आणि उत्कंठेचा संगम

‘अडकित्ता’मध्ये आधुनिक पालकत्वाचा आनंद आणि आव्हाने, कौटुंबिक नात्यांतील गुंतागुंत, व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यातील संघर्ष यांचा मिलाफ पाहायला मिळणार आहे. सहानुभूती, समजूतदारपणा, क्षमा आणि प्रिय व्यक्तींसाठी घेतले जाणारे निर्णय यांवरही चित्रपट भाष्य करतो. गोंधळाच्या आणि धावपळीच्या प्रसंगांमध्ये विनोद आणि नात्यांतील जिव्हाळा जपणारी ही कथा असल्याचे निर्मात्यांनी सांगितले. ‘अडकित्ता’चा प्रीमियर ११ सप्टेंबर २०२६ रोजी केवळ झी5वर होणार असून, सई ताम्हणकर, सिद्धार्थ चांदेकर आणि सखी गोखले यांच्या अभिनयासह पालकत्व आणि नात्यांवरील वेगळ्या कथानकामुळे या चित्रपटाकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### 'रेफकोल्ड इंडिया 2026'- आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व परिषद

**पुणे : दैनिक संध्या**

इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग,रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स(ISHRAE)तर्फे रेफकोल्ड इंडिया २०२६ या दक्षिण आशियातील भव्य आंतरराष्ट्रीय रेफ्रिजरेशन आणि कोल्ड चेन या प्रदर्शन व परिषद याचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन १९ ते २१ नोव्हेंबर २०२६ दरम्यान ॲग्रिकल्चर कॉलेज ग्राउंड,पुणे येथे भरणार आहे. रेफ्रिजरेशन आणि कोल्ड चेन क्षेत्रातील 'कुंभमेळा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या तीन दिवसीय प्रदर्शन व परिषदेत भारतासह परदेशातील हजारो उद्योग व्यावसायिक,उत्पादक,तंत्रज्ञान पुरवठादार, कंत्राटदार,धोरणकर्ते,शासकीय प्रतिनिधी,निर्णयकर्ते आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.300 हून अधिक स्टॉल्समध्ये स्मार्ट,शाश्वत आणि भविष्यासाठी सज्ज तंत्रज्ञानाचे प्रदर्शन; देश-विदेशातील उद्योग तज्ज्ञ, धोरणकर्ते आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग असेल. पुण्याची ओळख "भारतातील रेफ्रिजरेशनची राजधानी" म्हणून निर्माण झाली असून, शहरात रेफ्रिजरेशन क्षेत्रातील व्यावसायिक,उत्पादक,अभियंते, तंत्रज्ञ आणि तज्ज्ञांचे मजबूत नेटवर्क आहे. इशारे पुणे चाप्टर ने या क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.रेफ्रिजरेशन हँडबुक्स,कोल्ड स्टोरेज बेसिक्स व डिझाइन गाइड्स,तांत्रिक लेख,सादरीकरणे तसेच रेफकॉन आणि ग्रीन कॉनक्लेवस या सारख्या विविध उपक्रमांद्वारे ज्ञानाची देवाणघेवाण आणि उद्योगाच्या विकासाला चालना देण्यात आली आहे. अन्नसुरक्षा,औषधनिर्मिती,आरोग्यसेवा, कृषी आणि लॉजिस्टिक्स या क्षेत्रांसाठी रेफ्रिजरेशन आणि कोल्ड चेन पायाभूत सुविधा अत्यंत महत्त्वाच्या ठरत आहेत.या क्षेत्रात सध्या मोठ्या प्रमाणावर तांत्रिक परिवर्तन होत आहे.ऊर्जा आणि पाण्याचा वापर, पर्यावरणावरील परिणाम तसेच उच्च ग्लोबल वार्मिंग पोटेन्शिअल (GWP) असलेल्या रेफ्रिजरंट्सचा वापर यांसारख्या आव्हानांना सामोरे जाताना उद्योगाने ऊर्जा-कार्यक्षम प्रणाली, शाश्वत रेफ्रिजरंट्स, स्मार्ट तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण उपकरणे आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांचा स्वीकार करण्यास सुरुवात केली आहे.' रेफकोल्ड इंडिया 2026' मध्ये या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे सादरीकरण करण्यात येणार असून, उद्योगातील बदलते तंत्रज्ञान, बाजारपेठेतील संधी, नवीन व्यवसायाच्या शक्यता आणि भविष्यातील विकासाच्या दिशांवर चर्चा होणार आहे. 'रेफकोल्ड इंडिया 2026'हे रेफ्रिजरेशन आणि कोल्ड चेन क्षेत्रातील संपूर्ण उद्योग परिसंस्थेला एकत्र आणणारे,ज्ञानाची देवाणघेवाण,सहकार्य आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणारे व्यासपीठ ठरणार आहे.स्मार्ट तंत्रज्ञान,शाश्वत रेफ्रिजरेशन प्रणाली आणि ऊर्जा-कार्यक्षम पायाभूत सुविधांच्या माध्यमातून पर्यावरणावरील परिणाम कमी करण्याबरोबरच तापमान-नियंत्रित पुरवठा साखळी अधिक विश्वासार्ह आणि कार्यक्षम कशी करता येईल,यावर या प्रदर्शनात भर दिला जाणार आहे.

### रिक्षाच्या उजव्या बाजूने प्रवासी उतरविण्याचा धोकादायक प्रकार सीसीटीव्हीत कैद

**उरुळी कांचन: दैनिक संध्या**

येथील तळवाडी चौकात पुणे-सोलापूर महामार्गावर मंगळवारी (दि. १ सप्टेंबर) सायंकाळी सुमारे ६ वाजून २० मिनिटांच्या सुमारास अत्यंत धक्कादायक अपघात घडला. हडपसरच्या दिशेने आलेल्या रिक्षातून प्रवासी उतरत असताना अचानक त्याचा तोल जाऊन तो थेट महामार्गावर पडला. त्याचवेळी पाठीमागून येणाऱ्या टेम्पोच्या चाकाखाली तो गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून, या घटनेमुळे उरुळी कांचन परिसरातील बेकायदा व धोकादायक प्रवासी वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अज्ञात व्यक्ती हडपसरच्या बाजूने तीन चाकी रिक्षातून उरुळी कांचन येथे आला होता. रिक्षा तळवाडी चौक परिसरात थांबल्यानंतर तो रिक्षाच्या उजव्या साईडने म्हणजे महामार्गाच्या बाजूने खाली उतरत असताना अचानक त्याचा तोल गेला. व तो महामार्गावर पडताच पाठीमागून येणाऱ्या टेम्पोच्या चाकाखाली आल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून त्यामध्ये रिक्षा भर महामार्गावर थांबलेली असल्याचे दिसत असल्याची माहिती आहे. तसेच प्रवासी रिक्षाच्या उजव्या बाजूने खाली उतरत असल्याचेही दिसून येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रवासी उतरविण्यासाठी वाहन रस्त्याच्या कडेला सुरक्षितपणे न घेता महामार्गावरच थांबविले जात असेल, तर अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे आणखी किती निष्पाप नागरिकांचे बळी जाणार? हा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. पुणे-सोलापूर महामार्गावर उरुळी कांचन परिसरात मोठ्या प्रमाणात रिक्षा, पॅगो, मॅक्झिमा आणि इतर प्रवासी वाहनांतून वाहतूक केली जाते. अनेक वेळा प्रवासी वाहनाच्या उजव्या बाजूने उतरविले जातात. मात्र महामार्गावरून भरधाव वाहने ये-जा करत असताना अशा पद्धतीने प्रवासी उतरविणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. या अपघातातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे संबंधित टेम्पोमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक होत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत असल्याचा दावा करण्यात येत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार टेम्पोमध्ये अंदाजे १२ ते १५ प्रवासी असल्याचे दिसत आहे. जर ही बाब तपासात खरी ठरली, तर प्रवासी वाहतुकीचे नियम, वाहनाची क्षमता, परवाना आणि सुरक्षिततेच्या निकषांचे पालन होत आहे का? याची प्रशासनाने गांभीर्याने चौकशी करण्याची गरज आहे. पुणे सोलापूर महामार्गावरील हडपसर, लोणी काळभोर, कुंजीरवाडी, ते उरुळी कांचन परिसरापर्यंत प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या मोठी आहे. मात्र प्रवाशांना कुठे उतरवले जाते, वाहन कुठे थांबवले जाते, प्रवाशांची संख्या किती आहे आणि वाहनचालक नियमांचे पालन करतात का, यावर नियमितपणे कारवाई होते का नाही? असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित होत आहे.

### राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शारदाबाई पवार महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**बारामती : दैनिक संध्या**

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित शारदाबाई पवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शारदानगर, बारामती येथे राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक जागरूकता निर्माण करणे, नियमित व्यायाम व खेळाचे महत्त्व पटवून देणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे, हा या क्रीडा उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. या स्पर्धेचा निकाल बॅडमिंटन – मुली कु. समिधा रामभाऊ कवचाळे - प्रथम क्रमांक , कु. पूजा नाना झाकणे - द्वितीय क्रमांक, कु. वैष्णवी उत्तम घाडगे -तृतीय क्रमांक बॅडमिंटन – मुले कु. गोपाळ नेताजी गुंड – प्रथम क्रमांक, कु. अनिकेत राजेंद्र काटे – द्वितीय क्रमांक , कु. रामेश्वर दिलीप धडपडे - तृतीय क्रमांक बुद्धिबळ – मुले कु. आदेश पोपट गायकवाड – प्रथम क्रमांक, कु. कुणाल विजय सावंत द्वितीय क्रमांक ,कु. यश युवराज लिगडे - तृतीय क्रमांक या स्पर्धेतील सर्व विजेते खेळाडूंचा गौरव करण्यात आला स्पर्धेचे नियोजन महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. रणजीत देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# दिव्यांग जवानांच्या मनगटावर बांधली कृतज्ञतेची राखी

■ पुणे (दै. संध्या)

रणांगणातील संघर्ष संपला असला, तरी देशासाठी दिलेल्या त्यागाच्या खुणा या जवानांच्या शरीरावर कायम आहेत. त्या खुणांकडे केवळ दिव्यांगत्व म्हणून न पाहता त्यांच्या शौर्याची ओळख म्हणून पाहण्याचा संदेश देत रक्षाबंधनाच्या निमित्ताने तीनशेपेक्षा अधिक जवानांच्या मनगटावर राखी बांधण्यात आली. पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर आणि क्वीन मेरी टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये हा स्नेह सोहळा पार पडला.

सैनिक मित्र परिवारातर्फे आयोजित या उपक्रमातून जवानांच्या त्यागाला समाजाच्या कृतज्ञतेची ऊब मिळाली. यावेळी सीमा शिंदे, कल्याणी सराफ, उमा ताटके, मंजुळा भालिया, राखी कोकाटे, सारिका गायकवाड आणि सुवर्णा कुलाल उपस्थित होत्या. त्यांनी जवानांना राखी बांधून त्यांच्या शौर्याला आणि त्यागाला सलाम केला.

विश्वेश्वर सहकारी बँक, लोकमान्य मल्टीपर्पज सोसायटी, आर्ट ऑफ लिव्हिंग, लव्ह केअर शेअर फाऊंडेशन मधील पंचवीस पेक्षा अधिक भगिनींचा सहभाग देखील होता. रक्षाबंधनाच्या निमित्ताने जवानांना राखी बांधण्यासाठी आलेल्या महिलांनी त्यांच्याशी संवाद साधत आपुलकीने शुभेच्छा दिल्या. राखी बांधताना अनेक जवानांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता.

काही क्षणांसाठी पुनर्वसन केंद्रातील दैनंदिन वातावरणात सणाचा उत्साह, आपुलकी आणि कौटुंबिक जिव्हाळा अनुभवायला मिळाला.

आनंद सराफ म्हणाले, देशासाठी कर्तव्य बजावताना जखमी झालेल्या जवानांच्या त्यागाप्रती देशवासीयांच्या मनात असलेली कृतज्ञता अशा उपक्रमातून व्यक्त होते. जवानांसाठी मिळणारे हे प्रेम आणि आपुलकी ऊर्जादायी आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने त्यांच्यासोबत काही क्षण घालवून त्यांना आपलेपणाची जाणीव करून देणे, हीच या उपक्रमामागची भावना आहे.



## महिलांसाठी 'अस्मिता भवन' उभारणीची मागणी

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी**

■ चाकण (दै. संध्या)

चाकण शहराची वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक क्षेत्रातील वाढते महत्त्व लक्षात घेता महिलांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सक्षमीकरणासाठी चाकण नगरपरिषद हद्दीत 'अस्मिता भवन' तसेच महिला व बालकल्याणाच्या विविध उपक्रमांसाठी सीएआर निधीतून भरीव आर्थिक तरतूद करण्यात यावी, अशी मागणी चाकण नगरपरिषदेच्या महिला बालकल्याण समितीच्या सभापती तथा नगरसेविका रुपाली कांडगे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे. चाकण शहरातील महिला बचत गट, महिला उद्योजिका तसेच गरजू महिलांना एकाच छताखाली प्रशिक्षण, कौशल्य विकास, उत्पादनांचे प्रदर्शन व विक्रीसाठी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सुसज्ज 'अस्मिता भवन'ची गरज आहे. यासोबतच महिला बचत गटांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध



व्यवसायांचे प्रशिक्षण व विशेष अर्थसहाय्य देण्याची आवश्यकता वाटते. तसेच महिलांसाठी डे-केअर सेंटर अपेक्षित आहे. चाकण परिसरात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्र विकसित झाले असून, अनेक महिला रोजगारासाठी घराबाहेर असतात. त्यामुळे काम करणाऱ्या

> "महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी 'अस्मिता भवन', महिला कौशल्य विकास, बालसंगोपन केंद्र तसेच विविध महिला व बालकल्याण उपक्रमांना निधीतून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून द्यावा".
>
> **- रुपाली कांडगे, सभापती महिला बालकल्याण समिती.**

महिलांच्या लहान मुलांसाठी सुरक्षित व सुसज्ज बालसंगोपन व डे-केअर सेंटर सुरू करण्यात यावे, अशी मागणी रूपाली कांडगे यांनी केली आहे. या केंद्रामध्ये मुलांना पोषक आहार, प्राथमिक शिक्षण, खेळ तसेच आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. औद्योगिक कंपन्यांचा सीएसआर निधी महिला व बालकल्याणासाठी देणे हिताचे आहे. चाकण परिसरातील औद्योगिक कंपन्यांचा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणारा सीएसआर निधी महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास, बालसंगोपन आणि बालकल्याणाच्या उपक्रमांसाठी प्राधान्याने उपलब्ध करून द्यावा, तसेच संबंधित उद्योगसमूहांना याबाबत आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

## दारुवाला पेट्रोल पंपावर 'ऑनलाइन' २४ तास, डिझेल, पेट्रोल,सीएनजी सेवा सुरू

■ पुणे (दै. संध्या)

शिवाजीनगर येथील महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडचा (एमएनजीएल) डेपो ते लष्कर परिसरातील दारुवाला पेट्रोल पंपापर्यंत थेट सीएनजी गॅस आणण्यात यश आले आहे. बुधवार दि.२ सप्टेंबर २०२६ मध्यरात्रीपासून सीएनजी गॅस वितरण चालू झाले असून वाहनचालकांना १६ सप्टेंबर पर्यंत रात्री ११ ते सकाळी ७ या कालावधीत सुरुवातीला सीएनजी गॅस इंधन सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. सदर १६ सप्टेंबर नंतर २४ तास ही सेवा उपलब्ध होणार आहे. करोडो रुपये खर्च करून ९ इंची पाइपलाइन १ वर्षांपासून भूअंतर्गत घालण्याचे काम सुरू होते. त्यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्यांना तोंड देत हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) आणि एमएनजीएलच्या संयुक्त प्रयत्नांनी सीएनजी पाइपलाइन सोलापूर रस्त्यावरील पूलगेट येथील दारुवाला पेट्रोल पंपापर्यंत नेण्यात आली. लष्कराच्या सदर्न कमांडचे वरिष्ठ अधिकारी ब्रिगेडीयर तरुनेश यांच्या प्रयत्नांमुळे १३ वर्षांपासून रखडलेली परवानगी संरक्षण मंत्रालयाने अखेर दिली.



चाचणी अंती आता पूर्ण दाबाने सीएनजी पुरवठा दारुवाला पंपावर सुरू झाला. पुणे लष्कर परिसरातील हा पहिलाच पेट्रोल पंप ठरला असून पंपावर सीएनजी भरणा सेवा सुरू राहणार आहे. त्यामुळे वाहनचालकांना कोणतीही गैरसोय होणार नाही असे पेट्रोल पंप चालक आणि ऑल इंडिया पुणे पेट्रोल डिलर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष अली दारुवाला यांनी सांगितले. १९६५ पासून हा पंप नागरिकांच्या सेवेत आहे. अशी माहिती दारूवाला पेट्रोल पंपाचे संचालक अली दारूवाला यांनी दिली.



## वळती येथे ट्रॅक्टर पलटी होऊन शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

**शेतात मशागत करताना काळाचा घाला; परिसरात हळहळ**

■ उरुळी कांचन (दै. संध्या)

वळती (ता. हवेली) येथे शेतात मशागत करत असताना ट्रॅक्टर तालीवरून पलटी झाल्याने ट्रॅक्टरखाली दबून शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार,( ता. ४ सप्टेंबर) रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली. सोपान केरू कुंजीर (वय ५६, रा. वरचा मळा, वळती, ता. हवेली, जि. पुणे) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोपान कुंजीर हे स्वतःच्या मालकीच्या ट्रॅक्टरने शेतात मशागत करत होते. यावेळी ट्रॅक्टर तालीवरून अचानक पलटी झाला. या दुर्घटनेत सोपान कुंजीर हे ट्रॅक्टरखाली अडकले. घटनेची माहिती मिळताच त्यांचे पुतणे आदेश कुंजीर, जितेंद्र दत्तात्रय कुंजीर तसेच इतर नातेवाईकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी ट्रॅक्टरखालून सोपान कुंजीर यांना बाहेर काढले. या दुर्घटनेत त्यांच्या डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली होती. नातेवाईकांनी त्यांना चारचाकी वाहनातून उपचारासाठी सिद्धिविनायक हॉस्पिटल, उरुळी कांचन येथे दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. या दुर्दैवी घटनेमुळे वळती परिसरात हळहळ व्यक्त होत असून, कुंजीर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस स्टेशनमध्ये पुढील कार्यवाही सुरू आहे.

स्पर्धा स्कूल आयडॉल सीजन २ च्या अंतिम फेरीत

## पुण्यातील असामान्य तरुण प्रतिभांचे प्रदर्शन




■ पुणे(दै. संध्या)

स्पर्धा स्कूल ऑफ म्यूझिकने स्पर्धा स्कूल आयडॉल सीजन २ च्या अंतिम फेरीचे पुण्यातील कुमार पॅसिपिक मॉलमध्ये यशस्वी आयोजन केले. यामध्ये वाद्यवादन, गायन आणि नृत्य या तीन प्रकारांतील होतकरू कलावंतांची प्रतिभा, समर्पण आणि ध्यास जल्लोषात साजरा करण्यात आला. स्पर्धेच्या आरंभीच्या फेऱ्यांमध्ये यशस्वी झालेले स्पर्धक या अंतिम फेरीत एकत्र आले होते. यातील प्रत्येक स्पर्धकाने पालक, संगीत रसिक आणि पाहुण्यांचा समावेश असलेल्या उत्साही प्रेक्षकांसमोर मोहक सादरीकरण केले. या कार्यक्रमाने तरुण कलाकारांना त्यांचे कौशल्य दाखवण्यासाठी एक व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. तसेच, त्यांना रंगमंचावरील मौल्यवान अनुभव आणि आत्मविश्वास प्राप्त करण्याची संधी मिळाली. यावेळी सहभागींची सर्जनशीलता, तांत्रिक उत्कृष्टता आणि स्टेजवरील उपस्थितीने परीक्षक प्रभावित झाले. त्यामुळे स्पर्धा रोमांचक आणि अटीतटीची झाली. विद्यार्थ्यांची कटिबद्धता आणि त्यांचे कुटुंब व मार्गदर्शकांचे प्रोत्साहन यांचे प्रतिबिंब या सादरीकरणात पडले. प्रथम पारितोषिक विजेता - रोख ६००० रुपये बक्षीस, 'स्पर्धा' अभ्यासक्रमांसाठी ३० टक्के शिष्यवृत्ती (अटी व शर्ती लागू), ट्रॉफी, रेडिओ मिर्ची स्टुडिओला भेट देणे, विजेत्या सादरीकरणाचे रेडिओ मिर्ची (केवळ गायन आणि वाद्ये) वर प्रसारण आणि 'स्पर्धा'च्या ऑनलाइन हॉल ऑफ फेममध्ये उल्लेख. द्वितीय पारितोषिक विजेता – रोख ४००० रुपये बक्षीस, स्पर्धा अभ्यासक्रमांसाठी २५ टक्के शिष्यवृत्ती ट्रॉफी आणि 'स्पर्धा' ऑनलाइन हॉल ऑफ फेममध्ये उल्लेख. तृतीय पारितोषिक विजेते – रोख २००० रुपये बक्षीस, 'स्पर्धा' अभ्यासक्रमांसाठी २५ टक्के शिष्यवृत्ती (अटी व शर्ती लागू), ट्रॉफी आणि 'स्पर्धा' ऑनलाइन हॉल ऑफ फेममध्ये उल्लेख.

# प्लाझ्मा, प्रेशर, मिड आणि लेझर यांच्या बंदीला पूर्ण पाठिंबा

■ पुणे (दै. संध्या)

पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव काळात अनेक गणेशमंडळांमध्ये व विसर्जन मिरवणुकीमध्ये प्लाझ्मा, प्रेशर, मिड आणि लेझरचा मोठा वापर होतो. त्यामुळे फार मोठे ध्वनिप्रदूषण होते.

कांठळ्या बसणाऱ्या प्लाझ्मा प्रेशर मिडच्या आवाजामुळे अनेक वृद्ध व बालकांना या आवाजामुळे बहिरेपण येण्याचा त्रास होऊ शकतो. हे रोखण्यासाठी व आपला धार्मिक - सांस्कृतिक महोत्सव आनंदाने साजरा व्हावा यासाठी प्लाझ्मा प्रेशर मीड सिस्टमवर पोलिसांनी बंदी घातल्यास साऊंड अँड इलेक्ट्रिकल्स जनरेटर्स असोसिएशन, पुणे यांचा यास पूर्ण पाठिंबा असेल असे साऊंड अँड इलेक्ट्रिकल्स जनरेटर्स असोसिएशन पुणेचे अध्यक्ष बबलू रमझानी, उपाध्यक्ष शैलेश




गायकवाड, खजिनदार मेहबूब खान आणि कार्याध्यक्ष राजू कांबळे व इतर कमिटी मेंबर्स यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी शिरीष पाठक, सुनील ओव्हाळ, रमेश धोत्रे, उदय इनामके, राजरत्न पवार, संतोष गायकवाड, ज्येष्ठ कमिटी सदस्य बंडूशेठ वाळवेकर हे उपस्थित होते. ते म्हणाले की, पुण्यात संस्थेचे सुमारे ५५० सदस्य आहेत. गेल्या ७-८ वर्षांत मात्र पुण्याच्या बाहेरील भागातील काही व्यावसायिक पुण्यात या काळात प्लाझ्मा, प्रेशर, मिड व लेजर या नको वाटणाऱ्या तंत्रज्ञानाचा वापर करून परिस्थिती बिघडवत आहेत.

आमच्या संस्थेचे सदस्य वापरत असलेल्या सिस्टीम्स दर्जेदार कंपन्यांनी केलेल्या असतात. ऐकणाऱ्याला त्रास होणार नाही याची काळजी त्यात घेतलेली असते.

आम्ही सिस्टीम, स्पीकर, ॲम्प्लीफायर, मिक्सर इत्यादी पुरवतो. प्लाझ्मा, प्रेशर, मिड व लेजर पुरवत नाही. याकाळात एवढी मागणी असते की देशातील अनेक व्यावसायिक इथे येऊन या सिस्टीम्स भाड्याने देतात.

साउंड, लाईट, जनरेटर असा सारा व्यवसाय चालू राहावा व प्लाझ्मा, प्रेशर, मिड व लेजरचा वापर न करता आनंद व समाधानाने गणेशोत्सव व अन्य सण साजरे व्हावेत ही आमची स्पष्ट भूमिका आहे.

मात्र गेल्या काही वर्षांमध्ये पुण्याबाहेरील भागातील अनेक व्यावसायिक प्लाझ्मा, प्रेशर, मिड आणि लेजर याचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्याचा खूप अतिरेक झाला. कोणताही साउंड सिस्टम विना प्रेशर मीड साधारणता ७०-८० डेसिबल असते. तेच प्लाझ्मा, प्रेशर, मिड वापरल्याने आवाजाची लेव्हल ११० डेसिबलच्याही पुढे जाते आणि त्यालाच आपण डी. जे. चा त्रास होतो असे म्हणतो.